www.lokrakshanay.com  epaper.lokrakshanay.com  dainiklokrakshanay@gmail.com  +91 97023 86118

दैनिक
# लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ
सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ

• वर्ष - ०२, • अंक ०६ • पृष्ठे- ०६ • ठाणे, बुधवार, ८ मे २०२४ • RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 • रु.२/-

# ठाणे जिल्ह्यातील मतदानाच्या पूर्व संध्येला नरेंद्र मोदी, राज ठाकरेंची होणार सभा

## खा.डॉ.श्रीकांत शिंदे, केंद्रीय मंत्री कपील पाटील यांच्या प्रचारार्थ होणार जाहीर सभा





ठाणे, यश सावंत : कल्याण आणि भिवंडी लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे, केंद्रीय मंत्री कपील पाटील यांच्या प्रचारार्थ पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या जाहीर सभा ठाणे जिल्ह्यातील मतदानाच्या पूर्व संध्येला घेण्यात येणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची कल्याणमध्ये १२ मे रोजी जाहीर सभा जाहीर करण्यात आली होती. परंतु, भाजपच्या केंद्रीय प्रचार समिती आणि स्थानिक पातळीवरील राजकारणाचा विचार करून ही सभा येत्या १५ मे रोजी घेण्यात येणार आहे. कल्याण पश्चिमेतील व्हर्टेक्स गृहसंकुलाजवळील प्रशस्त मैदानात या सभेचे नियोजन करण्यात आले आहे. दुपारी दोन वाजता ही सभा होईल, असे महायुतीचे भिवंडी लोकसभा मतदारसंघातील उमेदवार कपील पाटील यांनी सांगितले.

१२ मे रोजीची सभा ही केंद्रीय प्रचार समितीकडून आलेल्या निरोपानुसार रद्द करण्यात आली. यामध्ये कोणतेही राजकारण नसल्याचे भाजपचे नेते सांगत आहेत. परंतु, भिवंडी लोकसभा मतदारसंघात महायुतीचे कपील पाटील यांच्या विरुध्द राष्ट्रवादीचे सुरेश म्हात्रे, नीलेश सांबरे यांच्या बरोबर लढत होणार आहे. हा गड सहजासहजी राखणे भाजपला यावेळी जड जात असल्याने अखरेच्या टप्प्यात मोदी यांना सभेसाठी आणण्यात येत असल्याचे स्थानिक पदाधिकारी सांगतात.

महायुतीला पाठिंबा दिल्यापासून मनसेचे राज ठाकरे महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी ते जाहीर सभा घेत आहेत. कल्याणमध्ये एक सभा घेण्याचे आश्वासन खासदार डॉ. शिंदे यांच्या मागणीवरून राज ठाकरे यांनी दिले आहे. त्यामुळे येत्या आठवड्यात ही सभा होण्याची चिन्हे आहेत. फक्त ही सभा कोठे घेतली जाते याकडे सगळयांच्या नजरा आहेत. मनसेने महायुतीच्या उमेदवारांना पाठिंबा दिला असला तरी स्थानिक मनसेच्या कार्यकर्त्यांचे शिवसेना, भाजप कार्यकर्त्यांबरोबर मनोमिलन होत नसल्याची कुजबुज आहे. या कुजबुजीमुळे राज ठाकरे यांची कल्याणमध्ये सभा होणार की नाही याविषयी शंका व्यक्त केल्या जात आहेत. काही ठिकाणी शिवसेना,भाजप मध्ये कुरबुरीचे राजकारण आहे.

## थोडक्यात

### १ ईव्हीएम हॅक करण्यासाठी अंबादास दानवेंकडे अडीच कोटींची मागणी, पुण्यातील हॉटेलमधून आरोपीला अटक



पुणे, अभिजित येरल्लू

ईव्हीएम हॅक करतो म्हणत ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांच्याकडे अडीच कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे. याप्रकरणी पुण्यातून एकाला अटक करण्यात आली आहे. आरोपीला एक लाख रुपये घेताना रंगेहात पकडण्यात आलं आहे. अंबादास दानवे यांच्या भावाने सापळा रचत हा प्रकार उघडकीस आणला आहे. मारुती ढाकणे असे ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने ही कारवाई केली आहे. मारुती ढाकणे असे ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. तो मूळचा अहमदनगर जिल्ह्यातील राहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे. संभाजीनगर लोकसभा मतदारसंघात जेवढे एव्हिएम आहेत, ते सर्व हॅक करुन तुम्हाला हवा तसा निकाल देतो, असे आश्वासन देत अंबादास दानवेंना फोन केला. त्यासाठी अडिच कोटी रुपये दानवे यांच्याकडे मागण्यात आले. या संदर्भात दानवेंना संशय आणल्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार केली. पोलीसांनी सापळा रचत अंबादास दानवे यांच्याकडे पैसे दिले. पुण्यातील एका हॉटेलमध्ये मारुती ढाकणेला पैसे घेताना रंगेहात पकडले आहे. आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी या प्रकरणी ताब्यात घेतले आहे.

### नालासोपाऱ्यात पोलिसावर प्राणघातक हल्ला, पोलीस गंभीर जखमी




वसई, सचिन कदम :

नियंत्रण कक्षात मदतीसाठी फोन आल्यानंतर घटनास्थळावर गेलेल्या पोलिसावरच प्राणघातक हल्ला केल्याची घटना नालासोपारामध्ये उघडकीस आली आहे. नालासोपारा पूर्वेच्या संतोष भुवन येथील साईराम चाळीत रविवारी रात्री पती-पत्नीचे भांडण सुरू होते. रात्री ९ च्या सुमारास पत्नीने मद्यपी पती अरूण सिंग याला एका गाळ्यात बंद करून ठेवले होते. त्याने पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला फोन केला होता.

संतोष भुवन येथे गस्तीवर असणारे बीट मार्शल मच्छिंद्र राठोड हे गस्तीवर होते. त्यांनी गाळ्याचे दार उघडले. मात्र आत असलेल्या सिंग याने स्टीलच्या पाईपने राठोड यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात पोलीस शिपाई मच्छिंद्र राठोड गंभीर जखमी झाले. त्यांच्या डोक्यात ५ टाके पडले आहेत. याप्रकरणी पेल्हार पोलिसांनी हल्ला करणाऱ्या अरूण सिंग याला हत्येचा प्रयत्न, सरकारी कामात अडथळा आदी गुन्हे दाखल करून अटक केली आहे, अशी माहिती पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांनी दिली.

# शिष्यवृत्तीचा तपशील सादर न करणाऱ्या वैद्यकीय महाविद्यालयांवर होणार कारवाई

## राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने उचलली कठोर पावले




मुंबई, विशाल कारंडे

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने देशातील सर्व वैद्यकीय महाविद्यालये आणि आरोग्य संस्थांना २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील पदवी आंतरवासिता, निवासी डॉक्टर, वरिष्ठ निवासी डॉक्टर आणि विषेशोपाचार रुग्णालयांतील पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनाचा तपशील सादर करण्याचे निर्देश दिले होते. मात्र देशातील बहुतांश वैद्यकीय महाविद्यालयांनी याकडे दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आले आहे. त्याची दखल घेत तातडीने तपशील सादर न करणाऱ्या वैद्यकीय महाविद्यालयांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने वैद्यकीय महाविद्यालये व संस्थांना दिला आहे.

वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या विद्यावेतनावरून वाद निर्माण होत असतात. याची दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने पदवी आंतरवासिता, निवासी डॉक्टर, वरिष्ठ निवासी डॉक्टर आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या विद्यावेतनाचा तपशील चार आठवड्यांत सादर करण्याचे आदेश राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाला दिले होते. त्यानुसार आयोगाने देशातील सर्व वैद्यकीय महाविद्यालये व संस्थांना २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील विद्यावेतनाचा तपशील सादर करण्याचे निर्देश दिले होते.

# पाण्यासाठी जीवघेणा संघर्ष! मेळघाटातील 'खडीमल' गाव २८ वर्षांपासून टँकरग्रस्त



खडीमल गावातील लोकांना नियमित पिण्याचे पाणी मिळावे म्हणून ३ हातपंप, तलाव, विहिरी खोदण्यात आल्या होत्या मात्र सर्व पाणी पुरवठा करणाऱ्या योजना कुचकामी ठरल्या आहेत. जलजीवन मिशनसह अनेक योजना राबवूनही खडीमल गाव पिण्याचे पाणी मिळविण्यासाठी संघर्ष करीत आहे. गेल्या २८ वर्षांपासून सरकार खडीमल गावाला टँकरमुक्त करू शकले नाही, ही शोकांतिका असल्याचे बंड्या साने यांचे म्हणणे आहे. सुमारे १३०० लोकसंख्येच्या या गावाकडे एकही अधिकारी किंवा नेता फिरकत नाही, असे गावकरी सांगतात.

अमरावती, रोहित जैसवाल

मेळघाटमधील खडीमल गावात गेल्या २८ वर्षांपासून टँकरने पाणी पुरवठा सुरू आहे. गावातील महिलांना पिण्याचे आणि वापरण्यासाठी लागणारे पाणी मिळविण्यासाठी जीवघेणा संघर्ष करावा लागत आहे. टँकरने पाणी विहिरीत सोडण्यात येत आहे. विहिरीत सोडण्यात आलेल्या पाण्याचा उपसा करण्यासाठी महिलांना जीव धोक्यात घालून विहिरीच्या काठावर उभे रहावे लागते. जिल्हा मुख्यालयापासून शंभर किलोमीटर अंतरावर मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या क्षेत्रात वसलेले चिखलदरा तालुक्यातील खडीमल गाव पाण्याच्या प्रत्येक थेंबासाठी धडपड करीत आहे.

मेळघाटातील नवलगाव, चुनखडी, बिच्छुखेडा, माडीझडप या गावांमध्ये देखील तीव्र पाणीटंचाई असून गावातील लोकांना गढूळ पाणी प्यावे लागत आहे. खडीमलच्या विहिरीतील पाणी सुमारे ३०० फूट खाली गेले आहे. या गावात वर्षानुवर्षे टँकरने पाणी पुरवण्यात येते. मात्र, गावात टँकरने पाणी पुरवठा करण्याची निश्चित वेळ ठरलेली नाही. किती टँकरने पाणी पुरवठा करण्यात येणार, या बाबतसुद्धा स्पष्ट माहिती दिली जात नाही. गावात आणि आजूबाजूच्या गावात ट्रॅक्टर आणि टँकर आहेत. मात्र, प्रशासन बाहेरच्या ट्रॅक्टर आणि टँकरच्या मदतीने खडीमल गावात पाणी पुरवठा करीत आहे. खडीमल गावातील लोकांना नियमित पाणी मिळावे म्हणून आतापर्यंत आपल्या प्रशासनाने किमान २ कोटी रुपये खर्च केले असावे, असा आमचा अंदाज असल्याचे सामाजिक कार्यकर्ते ॲड. बंड्या साने यांनी सांगितले.

# ठाणे लोकसभेची जागा शिंदे गटाकडे गेल्याने मिरा भाईंदरमधील भाजपात निर्माण झालेली नाराजी अखेर दूर



भाईंदर - विशाल पाटील :

ठाणे लोकसभेची जागा शिंदे गटाकडे गेल्याने मिरा भाईंदरमधील भाजपात निर्माण झालेला नाराजी अखेर दूर झाली आहे. मंगळवारपासून भाजप पदाधिकाऱ्यांनी महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांच्या प्रचाराला सुरवात केली आहे.

ठाणे लोकसभेची जागा ही शिंदे गटाकडे गेल्याने मिरा भाईंदर शहरात भाजप मध्ये नाराजी पसरली होती. भाईंदरचे माजी आमदार नरेंद्र मेहता यांनी तर शिवसेनेच्या उमेदवाराचा प्रचार करण्यास भाजप कार्यकर्ते तयार नसल्याचे सांगितले होते. संजीव नाईक यांना उमेदवारी डावल्याने त्यांच्या भाजप मधील समर्थकांनी राजीनामे देण्यास सुरुवात केली होती. ही नाराजी दूर करण्यासाठी सोमवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाराजी पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेतल्या. या दोघांच्या प्रयत्नांनामुळे नाराजी नाट्य संपुष्टात आले. त्यामुळे सोमवारपासून मिरा भाईंदर भाजपने महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांच्या प्रचारास सुरुवात केल्याचे दिसून आले. मंगळवारी म्हस्के यांच्या मिरा भाईंदर मधील प्रचार रॅली मध्ये माजी आमदार नरेंद्र मेहता व त्यांच्या समर्थका सहभागी झाले होते. भाजपने उत्तर भारतीय मतदारांना आकर्षित करण्याला प्राधान्य दिले. यासाठी मिरा रोड येथे माजी आमदार नरेंद्र मेहता यांनी उत्तर प्रदेश राज्याचे उपमुख्यमंत्री तथा भाजप महाराष्ट्र राज्याचे प्रभारी दिनेश शर्मा यांच्या उपस्थितीत विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

### शिवसेनेची तुलना 'उंदराशी'

महाराष्ट्र राज्यात उद्धव ठाकरे यांनी घेतलेल्या भूमिकेचा विरुद्ध करण्यासाठी दिनेश शर्मा यांनी उपस्थितीत नागरिकांना उंदीर आणि साधूच्या गोष्टीचे एक उदाहरण दिले. यात नाव न घेता त्यांनी उद्धव ठाकरेच्या शिवसेनेला उंदराची उपमा दिली. यावेळी भाजप कार्यकर्त्यांमध्ये जोष निर्माण झाल्यानंतर त्यांनी स्वतःच कोणालाही उंदीर म्हणून संबोधले नसल्याचे स्पष्टीकरण दिले.


# नवी मुंबई शहरात वाहतूक नियमांचे उल्लंघन; वर्षभरात ९ हजार ३७३ वाहनांवर कारवाई



नवी मुंबई, दिगंबर जाधव

दिवसेंदिवस वाढत्या अपघातांची संख्या याचे मुख्य कारण म्हणजे वाहन चालवताना वाहतुकीचे नियम डावलून वाहने चालवली जातात. नवी मुंबई शहरातही वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याने अपघातांचे प्रमाण वाढत आहे. हे अपघात कमी करण्यासाठी वाशी आरटीओ विभागाकडून रस्ता सुरक्षा अंतर्गत वाहतूक नियम न पाळणाऱ्या वाहनांवर एप्रिल २०२३ पासून ते मार्च २०२४ पर्यंत एकूण ९ हजारहून अधिक वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे.आरटीओच्या वतीने रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत नेहमीच सुरक्षित प्रवास वाहतुकीचे धडे दिले जातात. हेल्मेट वापरणे, सीटबेल्ट लावणे, मोबाइलवर बोलत वाहन न चालविणे, डोन्ट ड्रिंक ॲण्ड ड्राइव्ह याविषयी जनजागृती किली जाते. सुरक्षित वाहतुकीचे नियम सांगितले जातात. तरीही वाहनचालक वाहतूक नियम पायदळी तुडवत बेशिस्तपणे वाहने चालवतात.कित्येकदा दुचाकीस्वार विनाहेल्मेट प्रवास करतात. परिणामी अनवधानाने अपघाताला निमंत्रण दिले जाते आणि हेल्मेट नसल्यामुळे त्यांच्या जिवावर बेतते.

# केंद्रपुरस्कृत साक्षरता परीक्षेत जिल्ह्यातील २४ हजारपेक्षा अधिक विद्यार्थी उत्तीर्ण



नाशिक, नितीन देवळेकर :

केंद्र पुरस्कृत उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी परीक्षेत जिल्ह्यातील २४ हजार ९८२ परीक्षार्थी उत्तीर्ण झाले असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी (योजना) प्रकाश अहिरे यांनी दिली आहे. या परीक्षेसाठी जिल्ह्यात ठिकठिकाणी साक्षरता वर्ग घेण्यात आले. स्थलांतरीत, शेतमजूर तसेच अन्य प्रौढ व्यक्तींना यामध्ये सहभागी करून घेण्यात आले. या प्रौढ साक्षरता वर्गाची १७ मार्च रोजी परीक्षा झाली. कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील दोन हजार ६८६ केंद्रावर असाक्षर परीक्षार्थींनी परीक्षा दिली होती. एकूण २४ हजार ९८२ परीक्षार्थी उत्तीर्ण झाले असून २३३ परीक्षार्थींना सुधारणा आवश्यक म्हणून घोषित करण्यात आले आहे. उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रम नियामक समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी व कार्यकारी समितीचे अध्यक्ष जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मार्गदर्शन लाभले असल्याचे अहिरे यांनी नमूद केले आहे.

# महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांचे १५ मे पर्यंत पावसाळापूर्व कामे पूर्ण करण्याचे निर्देश



नवी मुंबई, भावना जैन

शहरातील सर्व प्राधिकरणांमध्ये परस्पर समन्वय रहावा व पावसाळी कालावधीत कोणतीही अडचण उद्भवल्यास त्याचे तत्परतेने निराकरण व्हावे यादृष्टीने महापालिका आयुक्त तथा शहर आपत्ती व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डॉ. कैलास शिंदे यांनी यापूर्वी सर्व प्राधिकरणांच्या संयुक्त बैठकीत सूचित केल्याप्रमाणे नवी मुंबई महापालिकेमार्फत केल्या जाणाऱ्या पावसाळापूर्व कामांचा विभागनिहाय व सुविधानिहाय आढावा विशेष बैठकीत घेतला. त्यावेळी पावसाळापूर्व कामे १५ मे पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश पालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दिले आहेत.

शहर अभियंता विभागामार्फत विविध कामे शहरात सुरु आहेत. यामध्ये शहरातील सुरु असलेले चौकांचे कॉंक्रीटीकरण, विविध विभागातील पदपथ, खोदकामे, डांबरीकरण, विविध ठिकाणचे नाले, गटारे, गावठाणातील रस्ते, इमारती, समाजमंदिरे अशा विविध प्रकारची कामे करण्यात येत आहेत. त्यामुळे पालिका आयुक्तांनी शहरात सुरू असलेल्या कामांची सद्यास्थिती शहर अभियंता तसेच आठही विभागांचे कार्यकारी अभियंता यांच्याकडून विभागवार जाणून घेतली. यावेळी सुरू असलेली कामे १५ मे पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. हवामान खात्याच्या अंदाजानुसार यावर्षी पावसाळा कालावधी लवकर सुरू होणार असून पावसाचे दिवस कमी असतील मात्र तीव्रता अधिक असेल हे लक्षात घेऊन त्यादृष्टीने तयारीत राहावे असे आयुक्तांनी सूचित केले बेलापूर ते दिघा अशा आठही विभागात सुरु असलेल्या रस्ते, चौक आदी कामांची सदयस्थिती जाणून घेतानाच होल्डिंग पाँड व त्यावरील फ्लॅप गेट बसविण्याची कामेही तातडीने पूर्ण करुन घ्यावीत असे निर्देश दिले आहेत. शहरात गटारांची सफाई करताना गटारातून काढलेला गाळ अनेक दिवस तसाच पडून राहतो. त्यामुळे काढला जाणारा गाळ हा दोन ते तीन दिवसांतच उचलण्याची कार्यवाही काटेकोरपणे केली जावी असेही आयुक्तांनी स्पष्ट निर्देश दिले आहेत.

## संपादकीय

# मतदान करण्यापूर्वी स्वत: विचार करा

मी अनेकदा गमतीने म्हणतो की भूतांचे दोनच प्रकार आहेत: शरीर नसलेले आणि शरीर असलेले! बहुतेक मनुष्य हे फक्त शरीर असलेली भूतं असतात. थोडक्यात, ते त्यांच्या भूतकाळाचे भूत आहेत. त्यांचे जीवन केवळ वारशाने मिळालेल्या सवयी आणि उधार घेतलेल्या विचारसरणीद्वारे चालू असते. जरी आध्यात्मिक प्रक्रिया द्वैताचा भ्रम संपवण्याबद्दल असली तरी एक महत्त्वाची पहिली पायरी म्हणजे, आधी 'एक व्यक्ती' बनणे.

जेव्हा तुम्ही अनेक प्रभावांचे परिणाम असता, तेव्हा तुम्ही एक 'समूह' आहात. जेव्हा तुम्ही एक समूह असता तेव्हा परिवर्तन अशक्य असते. लोकांचा समूह विकसित होऊ शकतो, परंतु त्याचे रूपांतर होऊ शकत नाही. परिवर्तन (transformation), हा शब्दच सूचित करतो, की त्याला एक आकार (form), आवश्यक आहे. समूहाला आत्मज्ञान होणे अशक्य आहे. आत्मज्ञान केवळ व्यक्तीलाच होऊ शकते.

एक व्यक्ती बनणे जर आध्यात्मिक प्रक्रियेसाठी आवश्यक असेल तर लोकशाही प्रक्रियेसाठी ते तितकेच आवश्यक आहे. दुर्दैवाने, बरेच लोक त्यांचे मत वैयक्तिक म्हणून नव्हे तर गट म्हणून देतात. आपण अशा युगात जगत आहोत जिथे भाऊबंदकीचेच नवीन रूप समोर येत आहे.

आपण आजकाल पक्षाच्या धोरणातील गुण-दोषांचा विचार करून मग भूमिका घेत नाही; आपला पाठिंबा नसलेल्या पक्षाने ('शत्रू टोळी') जर काही धोरणे आखली असतील, तर आपण त्यांचा तीव्र विरोध करतो आणि आपलं समर्थन असलेल्या पक्षाने आखलेली धोरणे असतील तर आपण त्यांचे मनापासून समर्थन करतो! हे निव्वळ भाऊबंदकीतील भांडणासारखे आहे आणि त्याचा लोकशाहीशी काहीही संबंध नाही.


... तर ही शोकांतिका

स्वतंत्र बुद्धीच्या जोरावर निर्णय घेण्याची नागरिकांची क्षमता हा लोकशाहीचा पाया आहे. सामूहिक निष्ठा तुम्हाला क्लबसदस्यत्वाची सुरक्षितता किंवा सामूहिक ओळखीची सोय देऊ शकते. पण ते फक्त धार्मिक कट्टरतेचे राजकीय स्वरूप आहे, धर्मवेडेपणाचा एक नवीन ब्रँड आहे. आपण 'धर्म' आणि 'जात' या अडथळ्यांच्या पलीकडे जाऊन मतदान करण्याविषयी बोलतो. पण पक्ष हाच एक नवा धर्म झाला आहे! आपल्यासारखे मतदान करणाऱ्यांना आपण 'आस्तिक' मानतो आणि इतरांना 'नास्तिक'. ही अधोगतीकडे नेणारी परिस्थिती आहे.

बहुतेक लोक एखाद्या पक्षाला मत देतात, याचे कारण त्यांच्या पालकांनी आणि आजी-आजोबांनी त्या पक्षाला मत दिले आहे; किंवा त्यांनी जर वेगळा विचार केला, तर त्यांच्या मित्र वर्तुळातून ते वगळले जातील. अमेरिकेत तुम्ही एखाद्याला त्यांच्या मतदानाच्या इतिहासाबद्दल विचारलेत, ते सहसा म्हणतात, मी रिपब्लिकन आहे, याचे कारण माझे वडील आणि आजोबा रिपब्लिकन होते. ''तुमचे राजकारणही अनुवांशिक असेल, तर ही एक शोकांतिका आहे!''

लोकशाहीची कल्पना ही एक विलक्षण कल्पना आहे. पण लोकशाही चालवायची असेल, तर प्रत्येक व्यक्तीला स्वतःचा विचार करता आला पाहिजे आणि मतदान करता आले पाहिजे. जेव्हा समूह एकत्रितपणे मतदान करतात तेव्हा ही लोकशाहीच्या वेशात सरंजामशाही असते. तुम्ही कुटुंब, जात किंवा धार्मिक गट म्हणून मतदान करत असाल, तर याचा अर्थ तुम्ही आता स्वतःचा विचार करत नाही. तुम्ही गुप्त मतपत्रिकेद्वारे मिळालेली संपूर्ण शक्यता वाया घालवली आहे. त्याची गुप्तता तुमच्या सद्सद्विवेकबुद्धीनुसार मतदानाच्या अधिकाराचे रक्षण करण्यासाठी होती. प्रत्येक निवडणूक एक मोठी शक्यता असते. प्रत्येक नागरिकाला गेल्या पाच वर्षांचे मूल्यमापन करण्याची आणि जाणीवपूर्वक स्वतंत्रपणे मतदान करण्याची ही संधी आहे. अंध सामूहिक निष्ठेवर पूर्वनिर्धारित निर्णय नाही. लोकशाहीचे सौंदर्य हे आहे की ते रक्तपाताशिवाय सत्तेचे हस्तांतर ती घडवते. मानवी इतिहासात क्वचितच हिंसा आणि रक्तपात न करता सत्ता हस्तांतरित झाली आहे.गुप्त मतपत्रिकेच्या बळावर हे सामंजस्यपूर्ण सत्तेचे हस्तांतर करणे हा आज आपला प्रचंड अधिकार आहे. मानवतेने धर्मांकडून जबाबदारीकडे जाण्याची वेळ आली आहे. हे केवळ आपल्या आध्यात्मिक जीवनासाठी उपयुक्त नाही. हे राजकीय प्रक्रियेसाठीही उपयुक्त आहे. 'आसक्त प्रवृत्तीपासून जागरूकतेकडे' हा खरा अध्यात्माचा मार्ग आहे. आणि 'पूर्वनिर्धारित मतापासून, विचारपूर्वक मतापर्यंत' - हा खरा लोकशाहीचा मार्ग आहे.

## आजची चित्रोळी



गळून फुलोरा टपोर दाणे
भरले कणसांत !
हिरव्यागार शेतात बाजरी
पिकेल जोसांत !!

मुकुंद कुलकर्णी,
कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई

# स्त्रीधनाचं 'सर्वोच्च' अंजन

स्त्रीधन म्हणजे लग्नाच्या आधी, लग्नाच्या वेळी आणि लग्नाच्या नंतर महिलेला माहेरकडून, माहेरच्या नातेवाईकांकडून, सासरकडून, सासरच्या नातेवाईकांकडून मिळालेले धन. यामध्ये केवळ रोख रक्कमच नाही, तर सोने, चांदी, अन्य वस्तू, जमीन आदी प्रत्येक गोष्टीचा समावेश होतो. स्त्रीधनाची संकल्पना उदयास येण्यामागचे मुख्य कारण म्हणजे पूर्वीच्या काळी आजच्याप्रमाणे मुलींना वडिलोपार्जित संपत्तीमध्ये हिस्सा मिळत नसे. 2005 नंतर कायद्यात बदल झाले आणि हा अधिकार स्त्रियांना मिळाला. तोपर्यंत बायका पुरुषांवर अवलंबून असायच्या. म्हणजे असे म्हटले जायचे की, जर स्त्री अविवाहित असेल किंवा विधवा असेल तर घरच्या पुरुषांनी तिचा सांभाळ केला पाहिजे.

पण तिला वडिलोपार्जित धनसंपत्तीमध्ये, मालमत्तेमध्ये तिला कसलाच अधिकार दिला गेलेला नव्हता. त्यामुळे स्त्रीकडे तिचे स्वतःचे काही तरी असले पाहिजे, जेणे करुन आयुष्यातल्या संकटकाळी तिला हात पसरण्याची वेळ येणार नाही, या विचारातून स्त्रीधनाची संकल्पना पुढे आली. सोप्या शब्दांत सांगायचे झाल्यास संकटकाळची आर्थिक सुरक्षितता लाभावी हा स्त्रीधनामागचा हेतू असतो. त्यामुळे स्त्रीधनावर पूर्णतः त्या स्त्रीचाच हक्क असतो.

आपल्याकडे आजही असे समजले जाते की, विवाहितेच्या माहेरकडून आलेली रोख रक्कम, दागदागिने, वस्तू आदी गोष्टी म्हणजेच स्त्रीधन. सासरच्यांकडून दिल्या गेलेल्या वस्तू, पैसे हे सीधन नाही. पण हा समज चुकीचा आहे. आपल्याकडे आजही विवाहानंतरचे वर्षभरातले पहिले सण, गरोदरपणा, डोहाळजेवण, बाळंतपण अशा अनेक समारंभांमध्ये, सणवारामध्ये विवाहित स्त्रीला विविध प्रकारच्या वस्तू, पैसे भेट म्हणून दिले जातात. या सर्वांचा समावेश स्त्रीधनात होतो आणि त्यावर ती विवाहिता वगळता अन्य कुणाचाही हक्क नसतो. अगदी पतीचा देखील !

सर्वोच्च न्यायालयाने अलीकडेच 'माया गोपिनाथन वि. अनुप एस. बी. अँड अनादर' या खटल्याप्रकरणी एका निकालातून ही बाब नव्याने स्पष्ट केली आहे. पत्नीकडे असलेल्या स्त्रीधनावर पतीचा काहीही अधिकार नसतो. संकटाच्या काळात याचा तो उपयोग करु शकतो; पण त्याने घेतलेली ही मदत पत्नीला परत करणे हे त्याचे नैतिक कर्तव्य आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. हा निकाल अनेकार्थांनी महत्त्वाचा असून ते जाणून घेण्यापूर्वी सदर खटल्याची पार्श्वभूमी लक्षात घ्यायला हवी. या प्रकरणातील याचिकाकर्ता महिलेला लग्नावेळी माहेरच्यांनी 89 सोन्याचे शिक्के भेट म्हणून दिले होते. तसेच लग्नावेळी तिच्या वडिलांनी पतीला दोन लाखांचा चेक देखील दिला होता.

लग्नाच्या पहिल्या रात्री पतीने तिच्याकडचे दागिने घेतले आणि ते सुरक्षित ठेवण्याच्या बहाण्याने सर्व दागिने आपल्या आईला दिले. पण या दागिन्यांचा वापर त्यांनी त्यांचे कर्ज झेडण्यासाठी केला. याप्रकरणी 2011 मध्ये त्या विवाहित महिलेने कुटुंब न्यायालयाचे दरवाजे ठोठावले. तेथे पती आणि त्याच्या आईने महिलेच्या दागिन्यांचा गैरवापर केल्यामुळे महिला नुकसानभरपाईसाठी पात्र ठरते असा निर्णय न्यायालयाने दिला. पण पुढे याला उच्च न्यायालयात आव्हान दिले. केरळ हायकोर्टाने 'महिलेचा पती आणि त्याच्या आईने सोन्याची हेराफेरी केल्याचं सिद्ध होऊ शकलेले नाही' असा निर्णय दिला. या निर्णयानंतर महिलेने सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले. तेथे न्या. संजीव खन्ना आणि न्या. दीपांकर दत्ता यांच्या पीठाने याप्रकरणी सुनावणी घेतली. यामध्ये स्त्रीधन पती आणि पत्नीची संयुक्त संपत्ती नसते. त्यामुळे पतीकडे अशा संपत्तीचे कोणत्याही स्वरुपात अधिकार किंवा नियंत्रण असू शकत नाही, असं कोर्टाने स्पष्ट केलं.

हा निकाल देत असताना सर्वोच्च न्यायालयाने केरळ उच्च न्यायालयाला उद्देशून केलेली टिप्पणी मला महत्त्वाची वाटते. बरेचदा कौटुंबिक नात्यांमध्ये चार भिंतींच्या आतमध्ये काय घडते याचे पुरावे आपल्याकडे नसतात. उदाहरणार्थ, मुलगी लग्न होऊन सासरी जाते तेव्हा लगेचच तिच्या नावचा लॉकर तयार नसतो. त्यामुळे परंपरागत चालत आलेल्या रितीरिवाजांनुसार, संस्कारांनुसार मुलगी आपल्याकडचे दागदागिने घरातील ज्येष्ठ व्यक्तीकडे सुपूर्द करते. घरातील एकाच्या नावावर लॉकर असेल तर तिथे ते दागिने ठेवले जातात.

पण या प्रक्रियेमध्ये विवाहितेचा त्यावरचा ताबा काढून घेतला जातो. जिथे नाती चांगली आहेत तिथे या सणावाराला या लॉकरमधील दागिने काढून वापरले जातात, बाकीची संपत्ती, पैसाही सुरक्षित ठेवला जातो. पण बर्याच कुटुंबांमध्ये या दागिन्यांवर, स्त्रीधनावर सासरच्या मंडळींची नजर असते. विशेषतः हुंड्यासाठी चटावलेल्या मंडळींमध्ये हा प्रकार हमखास पाहायला मिळतो. कारण अशा व्यक्तींना कितीही पैसा दिला तरी त्यांचे समाधान होत नाही. अशा ठिकाणी हे दागिने काढून घेतले

जातात.

या प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयाने मारलेला शेरा महत्त्वाचा आहे. गुन्हेगारी कायद्यामध्ये तक्रारदाराला किंवा फ़िर्यादीला त्याने केलेले आरोप सिद्ध करावे लागतात. याला कायद्याच्या भाषेत 'बर्डन ऑफ प्रूफ' म्हटले जाते. उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तीने दागिने चोरले किंवा ते विकून त्या पैशांचा गैरवापर केला असा आरोप केल्यास हे आरोप फ़िर्यादीला सिद्ध करावे लागतात. फौजदारी कायद्याच्या तत्वामध्ये जोपर्यंत आरोपनिश्चिती होत नाही किंवा दोषी ठरवले जात नाही तोपर्यंत कोणीही व्यक्ती ही निर्दोष मानली जाते. स्त्रीधनाची प्रकरणे ही प्रामुख्याने कौटुंबिक हिंसाचाराच्या प्रकरणामध्ये किंवा घटस्फोटाच्या मागणीमध्ये कौटुंबिक न्यायालयात नोंदवली जातात.

यासंदर्भातील कायदे हे दिवाणी स्वरुपाचे आहेत, फौजदारी नाहीयेत. त्यामुळे यासंदर्भातील टिप्पणी करताना सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की, 'प्रीपाँडरन्स ऑफ प्रोबॅबलिटी' पाहिले पाहिजे. म्हणजे काय तर, स्त्रीधनाशी संबंधित प्रकरणातील फिर्यादी महिला सांगत असलेल्या गोष्टी घडलेल्या असू शकतात का, याचा विचार करताना 'बेनिफिट ऑफ डाऊटस' हा तिला दिलाच पाहिजे. हा स्पष्टपणा मला महत्त्वाचा वाटतो. कारण बरेचदा आहे त्या कपड्यांवर विवाहिता घरातून बाहेर पडते. बरेचदा विवाहितेला काही दिवस तू माहेरी जा असे सांगितले जाते आणि परत सासरी आणतच नाहीत. अशा प्रकरणांमध्ये स्त्रीधनातून मिळालेल्या सर्व वस्तू सासरीच असतात.

अशा वेळी ती विवाहिता जी माहिती देत आहे त्याची शहानिशा करताना तिला झुकते माप दिले पाहिजे, ही भूमिका महत्त्वाची आहे. आजवर हा स्पष्टपणा कुठे तरी हरवलेला होता. न्यायालयांनी अशा प्रकरणांमध्ये दिलेल्या निकालांमध्ये एकवाक्यता नव्हती. काही वेळा न्यायाधिश विवाहितेला तुमच्याकडे दागिने नाहीयेत याचा पुरावा द्या असे म्हणायचे. जी वस्तू आपल्याकडे नाहीये त्याचा पुरावा कसा देणार? काही प्रकरणांमध्ये लॉकरचे तपशील तपासले जायचे. पण विवाहितेच्या नावावर लॉकर नसेल तर त्यामध्ये कोणी काय ठेवले, काय काढून घेतले हे ती कसे सिद्ध करू शकेल? ही सर्व परिस्थिती विचारात घेता सर्वोच्च न्यायालयाने 'बेनिफिट ऑफ डाऊटस' विवाहितेला देण्याबाबत स्पष्टता आणून एक खूप मोठे पाऊल टाकले आहे, असे म्हणावे लागेल. याखेरीज प्रूव्हिंग बियाँड रिझनेबल डाऊटस हा सिद्धांत स्त्रीधनाबाबत वापरु नका असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

पण न्यायालयाने आता सांगितले आहे की, असा प्रकार घडला असेल तर त्या स्त्रीधनाइतके पैसे तिला दिले गेले पाहिजेत. कारण संकटकाळात तिला वापरता यावे, आधार मिळावा म्हणून त्या स्त्रीधनाचे महत्त्व आहे. ते तिच्याकडू कुणीही काढून घेता कामा नये. यापूर्वीच्या प्रकरणांमध्ये उपलब्ध कायद्यांच्या आधारे अनेक बायकांना स्त्रीधन परत मिळाले आहे; पण त्यासाठी बराच खटाटोप करावा लागला आहे. मुळात स्त्रीधनाचा सासरच्या मंडळींकडून असा गैरवापर होऊ लागल्यामुळे बायकाही आता विचार करु लागल्या आहेत. आपले दागदागिने सासरी देण्यापेक्षा माहेरी ठेवेन, स्वतःचा लॉकर उघडेन किंवा त्या सर्वांचे फोटो काढून ठेवेन अशा प्रकारचा संरक्षणात्मक विचारही आता केला जात आहे. त्या अर्थाने हा निकाल महत्त्वाचा आहे.

पण न्यायालयाने आता सांगितले आहे की, असा प्रकार घडला असेल तर त्या स्त्रीधनाइतके पैसे तिला दिले गेले पाहिजेत. कारण संकटकाळात तिला वापरता यावे, आधार मिळावा म्हणून त्या स्त्रीधनाचे महत्त्व आहे. ते तिच्याकडू कुणीही काढून घेता कामा नये. यापूर्वीच्या प्रकरणांमध्ये उपलब्ध कायद्यांच्या आधारे अनेक बायकांना स्त्रीधन परत मिळाले आहे; पण त्यासाठी बराच खटाटोप करावा लागला आहे. मुळात स्त्रीधनाचा सासरच्या मंडळींकडून असा गैरवापर होऊ लागल्यामुळे बायकाही आता विचार करु लागल्या आहेत. आपले दागदागिने सासरी देण्यापेक्षा माहेरी ठेवेन, स्वतःचा लॉकर उघडेन किंवा त्या सर्वांचे फोटो काढून ठेवेन अशा प्रकारचा संरक्षणात्मक विचारही आता केला जात आहे. त्या अर्थाने हा निकाल महत्त्वाचा आहे.

अवतीभवती आपण पाहतो की, केवळ स्त्रीधनच नाही; तर अनेक बायका बचत गटासारख्या संस्थांमधून घरातल्या कामासाठी, लग्नासाठी, शिक्षणाच्या फीसाठी म्हणून कर्ज घेतात. माझ्यासाठी मला काही तरी करायचे आहे हा विचारच त्यांच्यात नसतो. त्यामुळे स्त्रीधनाचा वापर हा बहुतेक बायका या कुटुंबासाठीच करत असतात. कारण त्यांच्यावर तशा प्रकारचे संस्कारच परंपरागत केले जातात. आपण किती तरी बायका पाहतो की घर घ्यायचे असेल किंवा बांधायचे असेल तर अंगावरच्या सोन्याच्या बांगड्या, गळ्यतला दागिना काढून गहाण टाकण्यासाठी किंवा मोडण्यासाठी देतात. असे असताना पैसे येतात तेव्हा तिचे ते स्त्रीधन परत करण्याची नैतिक जबाबदारी पतीने पार पाडायला नको का? कारण ते स्त्रीधन हा त्यांच्या संकटकाळचा आधार आहे. असे असूनही कुंटुंबाच्या हितासाठी, अडचणीतून मार्ग निघण्यासाठी विश्वासाने जर ती विवाहिता हे स्त्रीधन सुपूर्द करत असेल तर तिचा विश्वासघात करण्याचा नैतिक अधिकार कुणालाही नाही. हीच बाब सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे.

# 'आरटीई' मूळ हेतूसह 'पुन्हा येईल ?'

शिक्षण हक्क कायद्याच्या (आरटीई) मूळ हेतूलाच धक्का पोचत असल्याचा विषय 'पुन्हा एकदा' चर्चेला आला आहे. 'पुन्हा एकदा ' म्हणण्याचे कारण असे, की गेला काही काळ या विषयावर मोठी ओरड होऊनही सरकारी स्तरावर त्याची काहीच दखल घेतली गेलेलीनाही. फेब्रुवारीमध्ये राज्य 'आरटीई'च्या नियमांत एक कळीचा बदल केला. आता 'आरटीई' अंतर्गत असलेल्या २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेशअर्ज प्रक्रिया अंतिम टप्प्यात असताना, उपलब्ध जागांच्या तुलनेत अत्यल्प अर्ज आल्याने हा विषय पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.



या विषयाची थोडी पार्श्वभूमी समजून घेणे आवश्यक आहे. 'आरटीई' अंतर्गत वंचित वर्गातील मुलांसाठी खासगी विनाअनुदानित आणि स्वयंअर्थसहाय्यित शाळांत २५ टक्के जागा राखीव असतात. त्यांचे शुल्क सरकार भरते. यंदा राज्य सरकारने हा नियम थोडासा वळवला. हा नियमबदल असे सांगतो, की ज्या खासगी विनाअनुदानित वा स्वयंअर्थसाहाय्यित शाळांच्या एक किलोमीटर अंतराच्या परिसरात सरकारी किंवा अनुदानित शाळा असतील, त्या शाळांना 'आरटीई' अंतर्गत २५ टक्के राखीव जागांवर वंचित वर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचे बंधन नसेल. सोप्या भाषेत सांगायचे, तर एखाद्या खासगी शाळेच्या एक किलोमीटर परिसरात कोणतीही सरकारी वा अनुदानित शाळा असेल, तर २५ टक्के कोटयातील विद्यार्थ्यांला त्या सरकारी वा अनुदानित शाळेत प्रवेश घ्यावा लागेल. राज्यातील शहरांत असलेल्या शाळांचा विचार केला, तर खासगी आणि सरकारी शाळांत एक किलोमीटरपेक्षा जास्त अंतर आहे, अशी स्थिती फार कमी ठिकाणी असेल. थोडक्यात २५ टक्के कोटयातील प्रवेशांसाठी एक प्रकारे खासगी शाळांची दारे बंदच करण्यात आहेत. पालकांच्या हे लक्षात आल्यानेच यंदा १५ ते ३० एप्रिल या कालावधीत २५ टक्के कोटयासाठी ६० हजार अर्जच आले आहेत. गेल्या वर्षी ही संख्या चार लाखांच्या घरात होती. आता हे प्रकरण न्यायालयात गेले असून, मुळात हा नियमबदल शिक्षण हक्क कायद्याच्या विपरीत असल्याने रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. मुंबई उच्च न्यायालयात याबाबत तीन ते चार याचिका दाखल झाल्या आहेत. त्यावरील सुनावणीदरम्यानच राज्य सरकारने आरटीई कोटयातील प्रवेशांसाठी अर्ज करण्याची मुदत ३० एप्रिलवरून १० मेपर्यंत वाढवत असल्याचे सांगितले आहे.

या प्रश्नाची एक बाजू अशी, की गेल्या काही वर्षांत 'आरटीई'च्या २५ टक्के कोटयांतर्गत खासगी शाळांत जे प्रवेश झाले, त्यातील अनेक विद्यार्थ्यांच्या शुल्काची प्रतिपूर्ती सरकारने केलेली नाही. खासगी शाळांचे अर्थकारणच कोलमडल्याने त्यांनी याबाबत तीव्र नाराजी दर्शवली होती. मग राज्य सरकारने आपल्या डोक्यावरचे शुल्क प्रतिपूर्तीचे 'ओझे' उतरविण्यासाठी या नियमबदलाची पळवाट काढली. वरवर हा तात्पुरता इलाज वाटला, तरी त्याचे परिणाम दीर्घकालीन आहेत. शिक्षण हक्क कायद्याने ६ ते १४ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार दिला आहे. पैशांअभावी शिक्षण अडू नये हा त्यामागील व्यापक हेतू. त्याचबरोबर वंचित वर्गाला २५ टक्के आरक्षणाद्वारे महागडया खासगी शाळांतही प्रवेश शक्य होऊन त्यायोगे तेथील दर्जेदार शिक्षण व सुविधा मिळाव्यात, हा त्यातील आणखी एक हेतू. शिवाय या खासगी शाळांत शिकणारी उच्च वर्गातील मुले आणि वंचित वर्गातील मुले यांच्यातील भेद पुसला जावा, असा व्यापक सामाजिक सामीलकीचा उद्देशही या सगळ्यामागे होता. राज्य सरकारच्या नियमबदलाने मात्र या सगळयाच उद्दिष्टांना हरताळ फासला जात आहे. वास्तविक शिक्षण ही सरकारची जबाबदारी असायला हवी, पण हा संवेदनशील विषय सरकारनेच 'ऑप्शन'ला टाकला आहे. शिवाय, पाल्याला खासगी शाळांत घालणाऱ्या अनेक पालकांनाही २५ टक्के कोटयातील विद्यार्थ्यांनी त्यांच्या पाल्याबरोबर शिकणे मान्य नाही. 'आम्ही एवढे पैसे भरायचे आणि हे फुकट शिकणार,' असा त्यातला आव आहे, त्यामागील सामाजिक उद्दिष्टांचे मात्र भान नाही. बरे, नियमबदल खासगी शाळांना अनुकूल करण्यामागे पालक या घटकाबरोबरच खासगी शाळा चालविणाऱ्या संस्थांमागच्या राजकीय प्रेरणाही आहेतच. अनेक खासगी शिक्षण संस्था प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष कोणाच्या मालकीच्या आहेत, हे नव्याने सांगायची गरज नाही. यात सत्ताधारी आणि विरोधक दोघेही एकाच बाजूला असल्याने तो निवडणुकीतील मुद्दा होईल, अशी भाबडी आशा सामान्याने न केलेलीच बरी. शिक्षणातील खासगीकरणाने निर्माण केलेला हा नवा वर्गवाद जोमाने फोफावत असताना, ती दरी भरून काढण्याची संधी आपण शिक्षण हक्क कायद्यातील एका नियमबदलाने गमावून बसलो आहोत, हे मात्र खरे. शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी न्यायालयात दाद मागून याला वाचा फोडली आहे, इतकाच काय तो दिलासा. बाकी 'आरटीई' मूळ हेतूसह 'पुन्हा येईल', आशा करत राहायचे.

# मतदानाबाबत मानवी साखळीच्या माध्यमातून जनजागृती

ठाणे : लोकसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा यासाठी स्वीपच्या माध्यमातून ठाणे शहरात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. मानवी साखळीच्या माध्यमातून मतदानाचे विविध संदेश हातात घेवून नागरिक रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून जनजागृती करीत असून रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी येणारी वाहने लक्ष वेधून घेत आहेत तर वाहनांमधील नागरिकांचा देखील या जनजागृतीस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे २५ ठाणे-लोकसभा





मतदार संघअंतर्गत,१४८ ठाणे विधानसभा मतदारसंघ सहा.निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती.उर्मिला पाटील यांनी नमूद केले.

लोकसभा मतदानात मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी ठाणे शहरात १४८ ठाणे विधानसभा मतदारसंघाच्या माध्यमातून विविध जनजागृती करण्यात येत आहे. नागरिकांनी मतदान करावे, यासाठी विद्यार्थ्यांच्या मार्फत आणि बचतगटातील महिलांच्या माध्यमातून मतदारांना आवाहन करण्यात येत आहे. .

मतदान जनजागृती उपक्रमाचा भाग म्हणून १४८ ठाणे विधानसभा मतदारसंघ,स्वीप पथक वेगवेगळे अभिनव उपक्रम राबवत आहेत. ज्या प्रभागात कमी मतदान झाले आहे त्या प्रभागात रिक्षा फिरवून ऑडियो द्वारे प्रसार करण्यात येत आहे. मी मतदान करणारंच..... आपण ही आपल्या मतदानासाठी सज्ज रहा. या आशयाचे मजकूर असलेले व त्यावर मतदान दिनांक २० मे २०२४ असे दर्शवणारे माहितीपत्रक सर्व नागरिकांना वाटण्यात आले.
लोकशाहीच्या उत्सवात मतदानाच्या दिवशी देशाच्या भविष्यासाठी मतदानाचा हक्क बजावून लोकशाही बळकट करावी आणि सर्वांनी न चुकता दिनांक २० मे २०२४ रोजी अवश्य मतदान करावे असे आवाहन स्वीप पथकाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये करण्यात आले.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# 23 भिवंडी लोकसभा मतदारसंघातील निरीक्षकांना भेटण्याची वेळ व तारीख जाहीर

ठाणे (जिमाका) - भारत निवडणूक आयोगाने 23 भिवंडी लोकसभा मतदारसंघासाठी सर्वसाधारण निरीक्षक, खर्च निरीक्षक व पोलीस निरीक्षकांची नियुक्ती केली असून या तीनही निरीक्षकांना भेटण्याची वेळ व तारीख जाहीर करण्यात आली आहे. 23 भिवंडी लोकसभा मतदारसंघासाठी सर्वसाधारण निरीक्षक म्हणून श्री. राजनवीर सिंग कपूर (आयएएस), खर्च निरीक्षक म्हणून श्री श्री.चित्तरंजन धंगडा माझी (आयआरएस) आणि पोलीस निरीक्षक म्हणून के. जयरामन (आयपीएस) यांची भारत निवडणूक आयोगाने नियुक्ती केली आहे.

## खर्च निरीक्षकांना भेटण्याची वेळ

■ 23-भिवंडी लोकसभा मतदारसंघासाठी नियुक्त सर्वसाधारण निरीक्षक श्री.कपूर (आयएएस) यांचा संपर्क क्रमांक 8356074530 व 02522-230200 आणि फॅक्स क्र. 02522-220108 असा असून genobserverbhiwandi@gmail.com हा त्यांचा ईमेल आहे. श्री.कपूर यांना उपविभागीय दंडाधिकारी यांचे कार्यालय, ठाणे रोड, गुलजार नगर, भिवंडी, ता.भिवंडी येथे दुपारी 12.00 ते 1.00 या वेळेत भेटता येईल.

■ पोलीस निरीक्षक श्री. जयरामन (आयपीएस) यांचा संपर्क क्रमांक 8788484783 असा असून ईमेल पत्ता 23.bhiwandi.plcobs@gmail. com असा आहे. श्री.जयरामन यांना ठिकाण एम.एस.टी.सी.एल. रेस्ट हाऊस, पहिला मजला, पडघा, ता.भिवंडी येथे दुपारी 4.00 ते सायंकाळी 5.00 या वेळेत भेटता येईल.

# साहसी खेळ प्रशिक्षण शिबिर उत्साहात संपन्न





कल्याण : क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, ठाणे आणि विनायक मार्शल आर्टस आणि फिटनेस झोन टिटवाळा यांच्या संयुक्त विद्यमाने वतीने 3 ते 5 मे दरम्यान 3 दिवसीय निवासी साहसी खेळांचे प्रशिक्षण आयोजीत करण्यात आले होते. वांगणी येथे आयोजित करण्यात आलेल्या या साहसी क्रीडा शिबिरात टिटवाळा, कल्याण, वासिंद, अंबरनाथ या विभागातील 30 पेक्षा जास्त मुले आणि मुली यांनी उस्फुर्तपणे सहभाग घेतला होता.

या साहसी खेळ प्रशिक्षण शिबिराचे आयोजक राज्य युवा पुरस्कार विजेते विनायक कोळी आणि क्रीडा प्रशिक्षक हरीष वायदंडे यांच्या मार्गदर्शनाखाली या कॅम्प ची सुरवात झाली. सर्व मुले आणि मुलींना 2 विविध गटात विभागले गेले. 3 दिवस सर्वांनी संघटित राहावे यासाठी या गटांना नावे देऊन विविध प्रकारच्या टीम बिल्डिंग ॲक्टिव्हीटी, रायफल शूटिंग आणि आर्चरी करून घेण्यात आल्या. त्यानंतर सर्वांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी लो रोप कोर्स, हाय रोप कोर्स आणि कमांडो अडथळा शर्यत हे साहसी क्रीडा प्रकार करवून घेण्यात आले.

■ दुसऱ्या दिवशी सकाळी रॅपलिंग, वॉल क्लायंबिंग, झिप लाईन या साहसी ॲक्टिव्हिटी करवून घेण्यात आल्या. दुपारी मुलांच्या चिकित्सक वृत्ती ला चालना देण्यासाठी रिव्हर राफ्टिंग चे आयोजन करण्यात आले होते. सर्व मुलांना राफ्ट बनविण्यासाठी फळया, दोरी आणि ट्यूब चा मदतीने राफ्ट बनविण्यास शिकविले गेले. तसेच सर्व मुलांना राफ्ट वर बसवून फिरविण्यात आले. मुलांच्या उपजत कला गुणांना वाव देण्यासाठी संध्याकाळी सांस्कृतिक कार्यक्रमाचे तसेच कॅम्प फायरचे आयोजन करण्यात आले. तिसऱ्या दिवशी स्पिन 360 डिग्री सायकलिंग, ह्युमन गायरो, झिप सायकलिंग, फ्लाईंग कार्पेट, झिप स्केट बोर्ड असे विवीध साहसी क्रीडा प्रकार करवून घेण्यात आले.

# ठाणे लोकसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या दैनंदिन खर्चाचा हिशोब तपासण्याच्या तारखा जाहीर

ठाणे (जिमाका) : 25 ठाणे लोकसभा मतदारसंघातील सार्वत्रिक निवडणूक 2024 मतदारसंघातील उमेदवारांचा खर्च भारत निवडणूक आयोगाच्या निवडणूक खर्च संनियत्रण नियमावलीतील भाग B १ व भारत निवडणूक आयोगाच्या दि.18 फेब्रुवारी 2019 च्या पत्रानुसार खर्च निरीक्षकांनी दैनंदिन खर्चाचा हिशोब 3 वेळा तपासावयाचा आहे. या तपासण्यांच्या तारखा जाहीर करण्यात आल्या असून उमेदवार / प्रतिनिधींनी वरील तारखांना उपस्थित राहण्याचे आवाहन 25- ठाणे लोकसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी मनिषा जायभाये-धुळे यांनी केले आहे.

## खर्च निरीक्षकांनी खर्च तपासण्याच्या तारखा खालीलप्रमाणे आहेत -

■ तपासणीचे ठिकाण :- सहाय्यक खर्च निरीक्षक यांचे कार्यालय, करमणूक कर शाखा, ४ था मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे.

■ खर्च तपासणीच्या तारखा :- १) दि.०९ मे २०२४, २) दि.१३ मे २०२४ व ३) दि.18 मे 2024.

■ तपासणीची वेळ :- सकाळी १०.०० वाजेपासून ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत.

■ उमेदवार/प्रतिनिधींनी सर्व प्रकारच्या नोंदवह्या जसे की, दैनंदिन खर्च नोंदवही, रोख नोंदवही, बँक नोंदवही, संबंधित प्रमाणके/देयके (खर्चाच्या पावत्या), बँक पासबुक व इतर सर्व मूळ कागदपत्रांसह वरील नमूद ठिकाणी व दिनांकास विहीत वेळेत उपस्थित राहण्याबाबत जाहीर आवाहन करण्यात येत आहे. वरीलप्रमाणे नमूद दिनांकास उपस्थित राहण्याबाबत उमेदवारांना ई-मेलव्दारेही लेखी सूचना देण्यात आल्या आहेत.

# सर्वद फाऊंडेशनचे शानदार पुरस्कार वितरण साईनाथ सतनूर, योगेश त्रिवेदी, संजय गवांदे आदी ठरले मानकरी



समाजातील कला, क्रीडा, पत्रकारिता, साहित्य, संस्कृती, मनोरंजन अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी मुंबई मधील ख्यातनाम अशा सर्वद फौंडेशनच्या विद्यमाने जीवनगौरव आणि राज्यस्तरीय स्टार उत्कृष्ट पुरस्कार नुकतेच एका शानदार सोहळ्यात प्रदान करण्यात आले. बंगळुरू येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते साईनाथ सतनूर यांना जीवनगौरव, ज्येष्ठ राजकीय विश्लेषक योगेश वसंत त्रिवेदी, ज्येष्ठ पत्रकार अशोक शिंदे यांना राज्यस्तरीय सर्वद स्टार उत्कृष्ट पत्रकार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आवाजाच्या दुनियेतील शहेनशहा आणि दूरदर्शन, आकाशवाणी वरील वृत्तनिवेदक दीपक वेलणकर, बोरीवली येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या रेखाताई बोऱ्हाडे यांना राज्यस्तरीय सर्वद स्टार उत्कृष्ट लेखक पुरस्काराने, याशिवाय वर्षा कुवळेकर, संजय गवांदे अशा अनेक साहित्यिकांना प्रख्यात स्पाईन सर्जन डॉ. साईज्योत राऊत आणि सुप्रसिद्ध लेखिका शुभदा रामसिंग यांच्या शुभहस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

सर्वद फाऊंडेशनच्या प्रमुख कवयित्री, लेखिका, पत्रकार, व्हॉईस आर्टिस्ट डॉ. सुचिता पाटील यांनी समारंभाचे आपल्या खुमासदार शैलीत सूत्रसंचालन केले. शिवभक्त राजू देसाई, सामाजिक कार्यकर्ते श्याम कदम, दैनिक कृषिवलच्या व्यवस्थापकीय संचालिका सुप्रिया पाटील, संत साहित्याचे अभ्यासक वामन देशपांडे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. डॉ. सुचिता पाटील, ओंकार देशमुख, डॉ. देशमुख, मीना कदम या सर्वद फौंडेशनच्या खंद्या शिलेदारांनी हा सोहोळा आपल्या अथक परिश्रमाने देवदुर्लभ असा घडवून आणला. प्रत्येक पुरस्काराने सन्मानित व्यक्तींची चित्रफीत डॉ. सुचिता पाटील यांनी आपल्या मधूर आवाजात तयार करून ती मोठ्या पडद्यावर प्रदर्शित केली आणि सोहोळ्याला एक वैशिष्ट्यपूर्ण आयाम मिळवून दिला. आपल्या प्रदीर्घ प्रास्ताविकात डॉ. सुचिता पाटील यांनी सर्वद फौंडेशनच्या कार्याचा सुरेख पद्धतीने आढावा सादर केला. जीवनगौरव पुरस्कार सन्मानित साईनाथ सतनूर यांच्या विवाहाच्या सुवर्णमहोत्सवी वर्धापन दिनानिमित्त या समारंभात केक कापून उभयतांचे अभीष्टचिंतन करण्यात आले. यावेळी सर्वदच्या संचालिका डॉ. सुचिता पाटील यांचा परिचय अशोक शिंदे यांनी करून त्यांना प्रास्तविकासाठी पाचारण केले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष सुप्रसिद्ध लेखिका शुभदा रामसिंग यांनी सर्वद फाऊंडेशनच्या कार्याची प्रशंसा करत हा पुरस्कार म्हणजे पुरस्कार विजेत्या मान्यवरांकडून इतरांनाही समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा देणारा आहे. त्यातून नवी सामाजिक आणि राष्ट्रहिताची पिढी घडण्यासाठी मदत होणार आहे.

प्रमुख पाहुणे डॉ. साईज्योत राऊत यांनीदेखील पुरस्कार विजेत्यांचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. समाजात आज आदर्श घ्यावा, अशा व्यक्ती फार दुर्मिळ झाल्या असून त्यांची दखल घेणे गरजेचे आहे. त्यांना शोधून त्यांचे कार्य इतरांपुढे आणणेदेखील आपले कर्तव्य आहे. त्या भावनेतून सर्वद करत असलेले कार्य महत्वाचे असल्याचेही त्यांनी सांगितले.

पुरस्कारविजेत्यांच्या वतीने वर्षा कुवळेकर आणि संजय गवांदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सर्वद फाऊंडेशच्या प्रमुख डॉ. सुचिता पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक – 2024

# पालघर मतदार संघामध्ये उमेदवारांना चिन्हाचे वाटप



पालघर : 22-पालघर (अ.ज.) लोकसभा मतदार संघातील लोकसभा निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना निवडणूक निर्णय अधिकारी गोविंद बोडके, निवडणूक निरीक्षक (सामान्य) अजय सिंग तोमर, अप्पर जिल्हाधिकारी भाऊसाहेब फटांगरे, निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) संजिव जाधवर, तहसिलदार सचिन भालेराव यांच्या उपस्थितित चिन्हाचे वाटप करण्यात आले.

निवडणूक रिंगणात असलेले उमेदवार, त्यांचा पक्ष आणि चिन्ह पुढीलप्रमाणे : भरत सामजी वनगा, बहुजन समाज पार्टी, चिन्ह (हत्ती), भारती भरत कामडी, शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे), चिन्ह (मशाल), डॉ. हेमंत विष्णू सवरा, भारतीय जनता पार्टी, चिन्ह (कमळ), राजेश रघुनाथ पाटील, बहुजन विकास आघाडी, चिन्ह (शिट्टी), मोहन बारकू गुहे, भारत आदिवासी पार्टी, चिन्ह (हॉकी आणि बॉल), कॉम्रेड राहुल मेढा, मार्क्सिस्ट लेनिनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (रेड फ्लॅग), चिन्ह (बॅट), विजया राजकुमार म्हात्रे, वंचित बहुजन आघाडी, चिन्ह (गॅस सिलेंडर), अमर किसन कवळे, अपक्ष, चिन्ह (बॅटरी टॉर्च), दिनकर दत्तात्रय वाढाण, अपक्ष, चिन्ह, (विहीर), मीना किशोर भड, अपक्ष, चिन्ह, (खाट).

# ठाणे शहरातील हौसिंग सोसायट्यांमध्ये स्वीप पथकाकडून जनजागृती



ठाणे - लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी हौसिंग सोसायटीतील प्रत्येक मतदाराने दूत म्हणून काम करुन निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावावा व राष्ट्रीय कार्यास हातभार लावावा., यासाठी प्रत्येकाने आपले कुटूंब, शेजारी, नातेवाईक यांना मतदान करण्यास प्रेरित करावे, असे आवाहन ठाणे शहरातील नौपाडा परिसरातील आनंदबन हौसिंग सोसायटीतील नागरिकांना मतदान जनजागृती कार्यक्रमांतर्गत करण्यात आले.

■ लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने २५ ठाणे-लोकसभा मतदार संघांतर्गत, १४८ ठाणे विधानसभा मतदारसंघ कार्यक्षेत्रातील मतदारांनी मोठ्या प्रमाणात मतदान करावे, याकरिता नाविन्यपूर्ण उपक्रम सहायक निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती.उर्मिला पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहेत. त्यामध्ये शहरातील उद्योजक, लघुउद्योजक संघटना, ज्येष्ठ नागरिक संघ, दिव्यांग संघटना व संस्था, मॉल आणि थिएटर असोसिएशन, शहरातील गृहनिर्माण संस्थांचे फेडरेशन तसेच विविध सेवाभावी संस्था यांच्यासोबत मतदार जागरूकता आणि सहभाग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. मतदान जनजागृती उपक्रमांतर्गत येत्या २० मे २०२४ रोजी मी मतदान करणारंच..... आपण ही आपल्या मतदानासाठी सज्ज राहा, या आशयाचे मजकूर असलेले व त्यावर मतदान दि. २० मे २०२४ असे दर्शवणारे माहितीपत्रकाचेही वाटप करण्यात आले.

# बहुजन वर्गाने " वोट भी दो ऑर नोट भी दो " , बहुजन समाज पार्टीचे मावळ लोकसभेचे उमेदवार "राजाराम पाटील " यांचे आवाहन !

कर्जत - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तमाम बहुजन वर्गाला " संविधानाच्या " माध्यमातून हजारो अधिकार बहाल केले , मात्र संविधान जरी महान असेल तरी ते " राबविणारे हात " आजपर्यंत संसद भवनात भांडवलदार व प्रस्थापितांचे असल्याने अधिकारापासून वंचित असलेला वर्ग नेहमीच याविरोधात आजपर्यंत लढाई लढत आहे . बहुजन समाज पार्टीचे संस्थापक अध्यक्ष मान्यवर कांशिरामजी या प्रमुख बाबींचा सखोल अभ्यास करून बहुजन वर्गाकडे संसद भवनात जाण्यास पुरेसे खर्चिक बळ नसल्याने मान्यवर कांशीरामजी यांनी बहुजन वर्गाला निवडणुकीत " वोट भी दो , ऑर नोट भी दो " , असे आवाहन केले होते , याच त्यांच्या विचारांचे मी देखील सूत्र हाती घेवून मावळ लोकसभा मतदार संघातून बहुजन समाज पार्टीच्या " सुप्रिमो बहेन मायावतींजी " यांना पंतप्रधान म्हणून होण्यासाठी अधिकृत उमेदवारी घेवून निवडणुकीस सामोरा जात असून मला देखील आपण " वोट भी दो ऑर नोट भी दो " , असे आवाहन बी एस पी चे उमेदवार राजाराम पाटील यांनी केले आहे.

राजाराम पाटील हे उरण विधानसभा मतदार संघात केगाव येथे रहात असून ते आगरी समाजाचे आहेत . पेशाने ते रिटायर्ड शिक्षक असून शेतकरी व मच्छीमार आहेत . शेतकऱ्यांचे प्रश्न घेवून त्यांनी शेतकरी प्रबोधिनी मार्फत २००५ साली कोकणात कुळ कायद्याचे आंदोलन यशस्वी केले .



■ कोकणात प्रदूषणकारी कोळसा प्रकल्पा विरोधात यशस्वी लढा दिला , कोकणात पर्यावरण वाचविण्यात देखील त्यांच्या लढ्याला यश आले होते . नवी मुंबईकरांच्या सिडको एम आय डी सी आंदोलनात त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे . सेझ विरोधी आंदोलनात ॲड. दत्ता पाटील यांच्या बरोबर सहभाग होता . सिडको साडेबारा टक्के आंदोलनात ते लोकनेते ॲड. दि. बा. पाटील यांच्या बरोबर राहून लढा दिला होता . ओबीसी चळवळीचे ते आजही नेतृत्व करत आहेत . केरूमाता लेणी वाचविण्याच्या आंदोलनात त्यांनी नेतृत्व केले आहे.

नवी मुंबई विमानतळ आंदोलनात प्रकल्पग्रस्त आगरी – कोळी – कराडी – भंडारी – एस.सी. – एस. टी. यांच्या न्याय हक्कासाठी ते लढले आहेत , गावठाण हक्क लढा मुंबई सह ठाणे , रायगड , पालघर , नवी मुंबई , महाराष्ट्राचे नेतृत्व करून तो लढा त्यांनी यशस्वी केला आहे . गावठाण सिमांकन योजनेस विधानसभेत शासनाकडून मान्यता मिळविण्यास त्यांना यश आले आहे , कूळ कायद्याच्या अंमलबजावणीसाठी अलिबाग विधानसभा त्यांनी लढविली आहे , सन २०१९ साली मावळ मधून लोकसभेच्या निवडणुकीत त्यांना ७६००० हजार विक्रमी मते मिळाली होती .

# त्यांचा कार्यकर्त्यांवर नाही तर फक्त परिवारावरच विश्वास

■ श्रीकांत शिंदे यांचा उद्धव ठाकरेंना टोला

■ कल्याण पूर्वेत महायुतीच्या मध्यवर्ती निवडणूक कार्यालयांचे उद्घाटन



कल्याण : कल्याण लोकसभा मतदारसंघात उमेदवार कोण हे ठरत नव्हतं, जेव्हा ठरवलं त्यांच्यावर पण विश्वास नाही, अशी परिस्थितीत त्यांच्यावर आली आहे. त्यांना कार्यकर्त्यांवर पदाधिकाऱ्यांवर नेत्यांवर कधीच विश्वास नव्हता, त्यांचा फक्त स्वतःच्या परिवारावरच विश्वास आहे, असा टोला खासदार श्रीकांत शिंदे यांनी नाव न घेता उद्धव ठाकरे यांना लगावला. श्रीकांत शिंदे यांच्या निवडणूक कार्यालयाचे कल्याण पूर्वेत उद्घाटन झाले, या उद्घाटन प्रसंगी श्रीकांत शिंदे यांनी ठाकरे गटासह इंडिया आघाडीवर हल्लाबोल केला. तर कल्याण लोकसभा मतदार संघातील महायुतील सर्वच घटक पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते एकदिलाने काम करीत असल्याने आपला विजय निश्चित असल्याचा विश्वास देखील डॉ. श्रीकांत शिंदे यांनी व्यक्त केला आहे.

कल्याण पूर्वेतील मतदात्यांना संपर्क साधता यावा व कार्यकर्त्यांनाही एकमेकांशी संपर्क साधता यावा या साठी निर्माण करण्यात आलेल्या या 'हायटेक' कार्यालयाच्या उद्घाटन समयी उपस्थितांना संबोधीत करतांना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे पुढे म्हणाले की, गेल्या दहा वर्षाच्या कार्यकाळात माझ्या माध्यमातून मतदार संघात केलेल्या विकासकामांची माहिती घराघरात पोहचविण्याची प्रत्येक कार्यकर्त्याची जबाबदारी आहे, त्या अनुषंगाने युतीतील प्रत्येक घटक पक्षाचा कार्यकर्ता हा उत्साहाने काम करीत आहेच, परंतु हाच उत्साह येत्या २० तारखे पर्यंत कायम राहिला पाहिजे याची सर्वांनी काळजी घेतली पाहिजे.

भाजपा जिल्हा अध्यक्ष नरेंद्र सुर्यवंशी यांनी शिवसेना उबाठा गटाच्या उमेदवारावरच त्यांच्या पक्ष श्रेष्ठींचा विश्वास नसल्याने दुसरा उमेदवार उभा केला होता असा दावा आपल्या भाषणात केला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अप्पा शिंदे यांनी सांगितले की, विजय हा डॉ. श्रीकांत शिंदे यांचाच आहे. परंतु गेल्या दोन वेळेपेक्षा जास्तीत जास्त मताधिक्य गाठण्यासाठी सर्वांनी सदैव प्रयत्नशील राहिले पाहिजे असे सांगितले.

या उद्घाटन सोहळ्यास माजी आमदार जगन्नाथ आप्पा शिंदे, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख गोपाळ लांडगे, अरविंद मोरे, उपजिल्हा प्रमुख रमाकांत देवळेकर, विधानसभा समन्वयक प्रशांत काळे, भाजपाचे कल्याण लोकसभा निरीक्षक शशिकांत कांबळे, भाजपा जिल्हाध्यक्ष नाना सूर्यवंशी, कल्याण पूर्व भाजपा कल्याण पूर्व मंडल अध्यक्ष संजय मोरे, माजी नगरसेवक निलेश शिंदे, नवीन गवळी, रिपाइंचे ज्येष्ठ नेते अण्णासाहेब रोकडे यांच्यासह महायुतीतील सर्व घटकपक्षांचे प्रमुख पदाधिकारी, माजी नगरसेवक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# किनवट राष्ट्रीय राज्यमहामार्ग तात्काळ दुरुस्त करा अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करू



किनवट : किनवट शहरातून रस्ता रुंदी करण्याच्या नावावर मागील पाच वर्षापासून शहरांमधील चुंगी नाका ते डॉ. आंबेडकर चौक रस्त्याची दयनिय अवस्था असल्यामुळे या रस्त्यावर वाहन चालकांना व व्यापाऱ्यांना धुळीचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. रस्ता रुंदीकरण जेव्हा होईल तेव्हा होईल परंतु तात्काळ सदरील रस्त्याचे डांबरीकरण करण्यात यावे अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन छेडू असा इशारा किनवट तालुका पत्रकार संघटनेच्या

वतीने देण्यात देण्यात आला आहे. सविस्तर वृत्त असे की भोकरपाटा ते धनोड्यापर्यंत 161 राष्ट्रीय माहामार्ग रुंदीकरणाचे काम सुरू झाले परंतु काही ठिकाणी निकृष्ट दर्जाचे काम झाल्याने या रस्त्यावर अनेक अपघातही घडले तर शहरातील रस्ता रुंदीकरणाच्या नावावर या रस्त्याकडे शासनाचे व

लोकप्रतिनीधीचे लक्ष नाही. शिवाय पाच वर्षापासून शहर विशीयांना या रस्त्या व वरुन चालतांना जिव मुठीत धरुन चालावे लागत आहे हीवाळा उन्हाळा धुळच धुळ तर पावसाळ्यात चिखल पाण्याचा जीव घेणा त्रास रस्त्याची कोणतेही डागडूगी नसल्यामुळे संपूर्ण रस्ता हा खड्डेमय झाला आहे.

■ अरुंद रस्ता त्यातल्या त्यात न्यायाची देवता मानली जाणारी न्यायालय यासमोरही संपूर्ण खड्डे व धुळीचे साम्राज्य जमले आहे जागोजागी खड्डे पडल्यामुळे वाहनधारकांना वाहने चालवणे ही कठीण होत आहे. अनेकदा छोटे मोठे अपघातही घडले परंतु सदरील रस्त्याकडे वारंवार निवेदने व मागण्या करूनही प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. स्थंभ ते डॉ. आंबेडकर चौक हा शहरातील मुख्य रस्ता असून याच रस्त्यालगत न्यायदेवतेचे न्यायालय आहे परंतु रस्ता रुंदी करण्याच्या नावावर सदरील रस्त्याची दुरावस्था ही पाच वर्षापासून चालू असून संपूर्ण रस्त्याने खड्डे झाले . सदरील रस्ताचे रुंदीकरण होईल तेव्हा होईल परंतु आज स्थितीला रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी या प्रकारचे निवेदने व मागण्या वारंवार करूनही प्रशासन दुर्लक्ष करत असल्यामुळे पत्रकार संघटनेने सदरील रस्त्यावर होणारे अपघात टाळण्यासाठी तात्काळ रस्ता डांबरीकरण करण्यात यावा ही मागणी शासनाकडे केली .

# IPL 2024 मध्ये आतापर्यंत 12 शतकं; सूर्यकुमारची 51 चेंडूत शतकीय खेळी



मुंबईः आयपीएल 2024 च्या 55 व्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादने 20 षटकांत 8 गडी गमावून 173 धावा केल्या. प्रत्युत्तरात मुंबईने 17.2 षटकांत तीन गडी गमावून 174 धावा केल्या आणि सामना सात गडी राखून जिंकला. या विजयासह मुंबई पॉइंट टेबलमध्ये 10व्या स्थानावरून नवव्या स्थानावर पोहोचली आहे. आता संघाच्या खात्यात आठ गुण आहेत. याशिवाय सनरायझर्स हैदराबाद 12 गुणांसह चौथ्या स्थानावर कायम आहे. मुंबईच्या या विजयात सूर्यकुमार यादव आणि टिळक वर्मा यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. दोन्ही फलंदाजांमध्ये 143 धावांची नाबाद भागीदारी झाली. वानखेडे स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात हैदराबादचे गोलंदाज संघर्ष करताना दिसले. मुंबईच्या फलंदाजांनी त्याला पराभूत केले.

शतकांच्या बाबतीत सूर्या रोहितच्याबरोबरीने पोहोचला

या सामन्यात सूर्याने 51 चेंडूंचा सामना करत 102 धावा केल्या. यावेळी त्याने 12 चौकार आणि 6 षटकार ठोकले. विशेष म्हणजे या सामन्यात सूर्याचा स्ट्राईक रेट 200 होता. यासह, 360 डिग्रीचा फलंदाज मुंबईसाठी दोन शतके झळकावणारा दुसरा फलंदाज ठरला. त्याच्या आधी रोहित शर्माने हा पराक्रम केला होता. आता सूर्याने रोहितची बरोबरी केली आहे.

मुंबई इंडियन्ससाठी सर्वाधिक शतके ठोकणारे फलंदाज

शतकी खेळाडू
2 रोहित शर्मा
2 सूर्यकुमार यादव
1 सचिन तेंडुलकर
1 सनथ जयसूर्या
1 लेंडल सिमन्स
1 कॅमेरॉन ग्रीन

कोहलीच्या नावावर टी-20 क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतकं

मुंबईच्या या स्फोटक फलंदाजाने आपल्या T-20 कारकिर्दीतील सहावे शतक झळकावले. सर्वाधिक शतके करणारा तो पाचवा फलंदाज आहे. या बाबतीत विराट कोहली आघाडीवर आहे. त्याच्या नावावर नऊ शतकांची नोंद आहे. तर रोहित शर्मा 8 शतकांसह दुसऱ्या स्थानावर आहे. हैदराबादविरुद्ध झालेल्या सामन्यात हिटमॅनला केवळ चार धावा करता आल्या.

T-20 मध्ये सर्वाधिक शतके ठोकणारे भारतीय

शतकी खेळाडू
9 विराट कोहली
8 रोहित शर्मा
6 ऋतुराज गायकवाड
6 केएल राहुल
6 सूर्यकुमार यादव

सूर्य-टिळक यांनी विजय मिळवला

या सामन्यात मुंबई इंडियन्सची सुरुवात धक्कादायक झाली. सलामीला आलेला इशान किशन 26 धावांवर बाद झाला. यानंतर 31 धावांच्या स्कोअरवर संघाने दोन विकेट्स गमावले. कमिन्सने रोहितला बाद केले. यानंतर भुवनेश्वर कुमारने पाचव्या षटकात नमन धीरला बाद केले. तो खाते न उघडताच पॅव्हेलियनमध्ये परतला. यानंतर सूर्यकुमार यादव आणि टिळक वर्मा यांनी मोर्चा ताब्यात घेतला. या दोघांनी हैदराबादच्या गोलंदाजांची दखल घेतली. या सामन्यात सूर्याने 51 चेंडूंचा सामना करत 102 धावा केल्या. तर टिळक वर्माने 37 धावांची खेळी केली. हैदराबादकडून भुवनेश्वर, जॅनसेन आणि कमिन्स यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

चौथ्या विकेटसाठी सर्वोच्च भागीदारी

सूर्या आणि टिळक यांच्यात चौथ्या विकेटसाठी 143 धावांची नाबाद भागीदारी झाली. आयपीएलच्या इतिहासातील चौथ्या किंवा त्याहून कमी विकेटसाठी मुंबईसाठी ही सर्वात मोठी भागीदारी आहे. त्याचवेळी, लक्ष्याचा पाठलाग करताना, आयपीएलच्या इतिहासातील चौथ्या किंवा त्याहून कमी विकेटसाठी ही दुसरी सर्वोच्च भागीदारी आहे.

मुंबई इंडियन्ससाठी चौथ्या किंवा त्याहून कमी विकेटसाठी सर्वोच्च भागीदारी

143– टिळक वर्मा आणि सूर्यकुमार विरुद्ध सनरायझर्स हैदराबाद, वानखेडे, 2024

131 – कोरी अँडरसन आणि रोहित शर्मा विरुद्ध कोलकाता नाइट रायडर्स, कोलकाता, 2015

122 – किरॉन पोलार्ड आणि ए रायुडू विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगलोर, बेंगळुरू, 2012

119 – इशान किशन आणि किरॉन पोलार्ड विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगलोर, दुबई, 2020

आयपीएलमध्ये धावांचा पाठलाग करताना चौथ्या किंवा त्याहून कमी विकेटसाठी सर्वोच्च भागीदारी

144 – गुरकीरत सिंग आणि शिमरॉन हेटमायर (रॉयल चॅलेंजर्स बंगलोर) विरुद्ध सनरायझर्स हैदराबाद, बेंगळुरू, 2019

143 – टिळक वर्मा आणि सूर्यकुमार (मुंबई इंडियन्स) विरुद्ध सनरायझर्स हैदराबाद, वानखेडे, 2024

131 – एबी डिव्हिलियर्स आणि ख्रिस गेल (रॉयल चॅलेंजर्स बंगलोर) विरुद्ध पंजाब किंग्ज, मोहाली, 2012

130 – डेव्हिस मिलर आणि राजगोपाल सतीश (पंजाब किंग्स) विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगलोर, मोहाली, 2013

# अभिनयासाठी शिक्षण अन् देश सोडला, श्रद्धा कपूर-कतरिना कैफसह केलेले सिनेमे झाले फ्लॉप



संजय लीला भन्साळी यांच्या बहुप्रतिक्षिती 'हीरामंडी' या सीरिजची खूप चर्चा आहे. ही सीरिज १ मे रोजी नेटफ्लिक्स या ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित झाली. या सीरिजला मिश्र प्रतिसाद मिळत आहे. अशातच यातील एका अभिनेत्याची व त्याच्या अभिनयाची खूप चर्चा होताना दिसत आहे. या अभिनेत्याने सीरिजपूर्वी काही चित्रपटांमध्ये काम केलंय व मॉडेलिंग देखील केलं आहे. पण त्याला खरी ओळख ओटीटीमुळे मिळाली.

अबुधाबीचा आहे अभिनेता

आपण 'हीरामंडी' सीरिजमधील ज्या अभिनेत्याबद्दल बोलत आहोत त्याचं नाव आहे ताहा शाह बदुशा. ताहाने अनेक वर्षे इंडस्ट्रीत संघर्ष केला आणि त्यानंतर आज त्याला ही ओळख मिळाली आहे. ताहा शाह हा मुळचा अबुधाबीचा आहे. त्यांचे कुटुंब सुशिक्षित आहे. ताहाने शालेय शिक्षणानंतर बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन प्रोग्रामसाठी प्रवेश घेतला होता, पण एका सेमिस्टरनंतर त्याने शिक्षण सोडलं. त्याला अभिनयाची आवड होती, त्यासाठी तो आई-वडिलांची परवानगी घ्यायला त्यांची मनधरणी करत होता. यादरम्यान त्याने अनेक व्यवसायही केले आणि मग त्याने मॉडेलिंग सुरू केले.

श्रद्धा कपूरबरोबर पहिला चित्रपट, नंतर कतरिनासह केलं काम

मॉडेलिंग करत असताना ताहा मुंबईत शिफ्ट झाला. त्याने मायानगरीत आल्यावर अभिनय शाळेत प्रवेश घेतला. मुंबईत आल्यानंतर अवघ्या नऊ महिन्यांतच त्याला त्याचा पहिला चित्रपट 'लव्ह का द एंड' ची ऑफर मिळाली. या चित्रपटात त्याने श्रद्धा कपूरसोबत काम केलं होतं. पण हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर सपशेल आदळला होता. यानंतर ताहाने अनेक चित्रपटांमध्ये काम केलं पण त्याला पाहिजे तशी ओळख मिळाली नाही. ताहाने कतरिना कैफसह 'बार बार देखो' मध्येही काम केलं होतं, पण हा चित्रपटही बॉक्स ऑफिसवर कमाल करू शकला नव्हता. अशा रितीने त्याचे श्रद्धा व कतरिनाबरोबरचे सिनेमे फ्लॉप ठरले.

ओटीटीने मिळवून दिली ओळख

चित्रपट केले, पण फारसं यश न मिळाल्याने ताहाने ओटीटीवर पदार्पण केलं. त्याने एकता कपूरच्या 'बेकाबू २' मध्ये काम केले होते. त्यानंतर तो 'ताजः डिव्हाइड बाय ब्लड'मध्ये झळकला होता. यामध्ये त्याने मुराद नावाची भूमिका साकारली होती. या भूमिकेसाठी त्याचं खूप कौतुक झालं. आता ताहा संजय लीला भन्साळींच्या 'हीरामंडी'मध्ये ताजदार बलोचच्या भूमिकेत पाहायला मिळाला. ही सीरिज प्रदर्शित झाल्यापासून ताहाच्या सोशल मीडिया फॉलोइंगमध्ये मोठी वाढ झाली आहे. अभिनेता इंटरनेट क्रश झाला आहे.

# 'हीरामंडी' व 'शैतान'नंतर या आठवड्यात OTT वर येणार 'हे' जबरदस्त चित्रपट अन् वेब सीरिज


ओटीटी प्लॅटफॉर्मवर दररोज कोणतीतरी वेब सीरिज किंवा चित्रपट प्रदर्शित होत असतात. ओटीटीवर प्रत्येक वयाच्या व्यक्तीसाठी वेगवेगळ्या जॉनरचा कंटेंट उपलब्ध आहे. 'शैतान'पासून 'हीरामंडी'पर्यंत या आठवड्यात अनेक मोठे चित्रपट व सीरिज ओटीटीवर आले, त्यांना प्रेक्षकांची खूप पसंती मिळतेय. पण आता दुसऱ्या आठवड्यात प्रेक्षक ओटीटी प्लॅटफॉर्मवर नवीन कंटेंट शोधू लागले आहेत. या आठवड्यात कॉमेडी, हॉरर, ॲक्शन आणि रोमान्सचा मिलाफ असलेले अनेक दमदार चित्रपट आणि वेब सीरिज ओटीटीवर येणार आहेत. या आठवड्यात विविध ओटीटी प्लॅटफॉर्म्सवर काय नवीन पाहता येईल, जाणून घेऊयात.

अनदेखी सीझन ३

नंदिश संधू, हर्ष छाया यांची 'अनदेखी ३' ही सोनी लिव्हवरील सर्वात लोकप्रिय सीरिज आहे. या मालिकेचे पहिले दोन सीझन खूप हिट झाले, आता तिसरा सीझन १० मे रोजी प्रदर्शित होत आहे. ही मालिका हिंदी, तमिळ, तेलगू, मल्याळम, कन्नड, मराठी आणि बंगाली भाषेत प्रदर्शित होणार आहे. या मालिकेत दिव्येंदू भट्टाचार्य, सूर्या शर्मा, हर्ष छाया, आंचल सिंग, अंकुर राठी आणि अभिषेक चौहान यांच्या भूमिका आहेत.

२० वर्षांनी सिनेमागृहांमध्ये पुन्हा प्रदर्शित झालेल्या चित्रपटाची दमदार कमाई, दोन दिवसांत कमावले तब्बल...

सत्य घटनांवर आधारित 'हे'



K-Drama ओटीटीवर आहेत उपलब्ध; घरबसल्या पाहता येणार रोमान्स, सस्पेन्स अन् थ्रिलरचा मिलाफ

योद्धा

सिद्धार्थ मल्होत्रा, राशी खन्ना आणि दिशा पटानी यांचा चित्रपट 'योधा' २२ मार्च रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाला संमिश्र प्रतिसाद मिळाला होता. हा चित्रपट १५ मेपासून प्राइम व्हिडिओवर पाहता येईल.

बोल्ड कंटेंटमुळे प्रदर्शनावर घालण्यात आली बंदी, 'हे' चित्रपट ओटीटीवर आहेत उपलब्ध, वाचा यादी

आदुजीविथम– द गोट लाइफ

'आदुजीविथम – द गोट लाइफ' हा मल्याळम सर्व्हायव्हल ड्रामा आहे. हा बेंजामिनच्या 'आदुजीविथम' या कादंबरीवर आधारित आहे. यात सौदी अरेबियामध्ये मेंढपाळ म्हणून गुलाम बनवलेल्या मल्याळी मजूर नजीबची सत्यकथा दाखविण्यात आली आहे. यात पृथ्वीराज सुकुमारन, जिमी जीन-लुईस आणि केआर गोकुळ, तालिब अल बलुशी, रिक अॅबे, अमाला पॉल आणि शोभा मोहन यांच्या भूमिका आहेत. हा चित्रपट डिज्नी प्लस हॉटस्टारवर १० मे २०२४ पासून पाहू शकता.

ओटीटीवरील सर्वात भयावह सिनेमे अन् वेब सीरिजची यादी, 'या' कलाकृती पाहून स्वतःच्या सावलीचीही वाटेल भीती

मर्डर इन माहिम

आशुतोष राणा व विजय राज फिजियोलॉजिकल क्राइम थ्रिलर सीरिज 'मर्डर इन माहिम'मध्ये मुख्य भूमिकेत आहेत. या मर्डर मिस्ट्री सीरिजमध्ये शिवानी रघुवंशी व शिवाजी साटमदेखील दिसतील. ही सीरिज 10 मे रोजी जिओ सिनेमावर रिलीज होईल.

## दैनिक राशी भविष्य

**मेष** – जेवणात मीठाची गरज ही अपिरहार्य असते, आपल्याला आनंदाची, सुखाची खरी किंमत कळण्यासाठी दुखाची गरज भासतेच. आज तुम्हाला आपल्या संतानमुळे आर्थिक लाभ होण्याची शक्यता दिसत आहे यामुळे तुम्हाला बराच आनंद होईल. तुमच्या पालकांसोबत तुमचा आनंद वाटा.नुकसान देऊ शकतो.

**वृषभ** – आरोग्य चांगले राहील. आपल्या धनाचा संचय कसा करावा याचे कौशल्य आज तुम्ही शिकू शकतात आणि याच कौशल्याला शिकून तुम्ही आपले धन वाचवू शकतात. त्याच त्याच कामातून थोडी उसंत घेण्याची गरज आहे आणि आज मित्रमंडळींसमवेत बाहेर जाण्याची गरज आहे. प्रणयराधन करण्याच्या आठवणींनी तुमचा दिवस व्यापून राहील.

**मिथुन** – अध्यात्मिक व्यक्तीच्या शुभाशिर्वादामुळे तुमच्या मनाला शांतता लाभेल. आर्थिक आघाडीवरील सुधारणा तुम्हाला तुमची प्रलंबित देणी आणि बिले देण्यास उपयोगी पडतील. आपल्या कुटुंबाला पर्याप्त वेळ द्या. तुम्ही त्यांची काळजी करता हे त्यांना जाणवू द्या.

**कर्क** – तुमचा उत्साह वाढविण्यासाठी सुंदर उज्ज्वल आणि वैभवशाली चित्र मनात ठसवा. गुंतवणूक करणे बऱ्याच वेळा तुमच्यासाठी खूप फायदेशीर ठरेल आज तुम्हाला ही गोष्ट लक्षात येऊ शकते कारण जुन्या गुंतवणुकीतून आज तुम्हाला उत्तम नफा होऊ शकतो.

**सिंह** – मुलांमुळे आजची संध्याकाळ प्रसन्न राहील. रटाळ कंटाळवाण्या, त्रासदायक दिवसाचा निरोप घेण्यासाठी, रात्रीच्या जेवणाचा मस्तपैकी प्लॅन करा.

**कन्या** – तुमच्यात आज उत्तम स्पुर्ती पहिली जाईल. तुमचे स्वास्थ्य आज पूर्णतः तुमची साथ देतील. तुम्ही जर अधिक धनप्राप्तीची अपेक्षा करत असाल तर सुरक्षित अशाच आर्थिक योजनांमध्ये पैसे गुंतवा. नातेसंबंध नव्याने दृढ करण्याचा दिवस.

**तुळ** – कार्यालयातून लवकर बाहेर पडण्याचा प्रयत्न करा आणि तुमच्या मौजमजा, विरंगुळ्यासाठी वेळ खर्च करा. कमिशन-लाभांश- किंवा मानधन याद्वारे फायदे मिळतील.

**वृश्चिक** – आज शांत राहा-तणावमुक्त राहाल. बँकेसंदर्भातील व्यवहार काळजीपूर्वक हाताळा. घरगुती प्रश्न आणि प्रलंबित घरगुती कामं पूर्ण करण्यासाठी लाभदायक दिवस.

**धनु** – विश्रांती, विरंगुळ्यासाठी तुमच्या प्रिय मित्रमंडळींसमवेत वेळ घालवा. आज जवळच्या मित्राच्या मदतीने काही लोकांना आज चांगले धन लाभ होण्याची शक्यता आहे.

**मकर** – इतरांविषयी शेरेबाजी करताना किंवा गृहितके ठरविताना त्यांच्या भावना समजून घ्या. तुमच्याकडून घेतलेला एखादा चुकीचा निर्णय संबंधितांवर विपरीत परिणाम करण्याबरोबरच तुम्हाला मानसिक तणावात टाकणारा ठरेल.

**कुंभ** – चार भिंती बाहेरील खेळांचे तुम्हाला आकर्षित करतील. ध्यानधारणा आणि योगाचा तुम्हाला फायदा होईल. दीर्घकालीन दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून गुंतवणूक करणे गरजेचे आहे. घरगुती कामाचा पसारा, ताण कमी करण्यासाठी आपल्या पत्नीला मदत करा.

**मीन** – मुलांमुळे आजची संध्याकाळ प्रसन्न राहील. रटाळ कंटाळवाण्या, त्रासदायक दिवसाचा निरोप घेण्यासाठी, रात्रीच्या जेवणाचा मस्तपैकी प्लॅन करा. मुलांच्या सहवासात तुम्ही आणखीन उल्हसित व्हाल.

# उन्हाळ्यात अतिथंड पाणी, बर्फाचे सेवन घातक

वाढत्या उन्हामुळे सध्या सर्वत्र अतिथंड पाणी, बर्फाचे सेवन करण्याचे प्रमाण वाढले आहे. परंतु याचे आरोग्यावर विपरीत परिणाम होतात. त्यामुळे केवळ घशाचे आजार होतात, असा समज आहे. परंतु घशासह कान आणि नाकाच्या आजारांनाही यामुळे निमंत्रण मिळत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

मागील काही दिवसांपासून उन्हाचा पारा ४० अंशाच्या आसपास जात आहे. प्रचंड उकाड्यापासून बचाव करण्यासाठी घरोघरी कुलर, एसीचा सहारा घेतला जात आहे.



परंतु वाढत्या उकाड्यासमोर कुलर, एसी देखील फिके पडले आहेत. यामुळे लोक अतिथंड पाणी, बर्फ गोळा, बर्फाचे पाणी, बर्फ टाकून बनवलेले शरबत, मसाला ताक याचा वापर मोठ्या प्रमाणावर करत आहे.

यामुळे शरीराला काही वेळ दिलासा मिळत असला तरी, अतिथंड पदार्थांच्या सेवनाचे आरोग्यावर विपरीत परिणाम होतात. टॉन्सिलचा त्रास असलेल्या रुग्णांना तर याचा अधिक त्रास होतो. त्यात हा बर्फ खाण्यायोग्य नसेल तर त्याचे आणखी गंभीर परिणाम होतात.

उन्हाळ्यात अशक्तपणाचा वाढतोय धोका.! कसा करावा उष्माघातापासून बचाव ?

अतिथंड पदार्थांचे किंवा बर्फाच्या सेवनाने केवळ घसाच नव्हे कान आणि नाकाच्या आजारांना देखील निमंत्रण मिळते. बर्फ खाण्यायोग्य नसेल तर त्याचे आणखी विपरीत परिणाम होतात. यामुळे अतिथंड पदार्थांचे सेवन टाळावे. कुलर, एसीच्या वाऱ्यात जास्त वेळ बसू नये.

**– डॉ. पराग नारखेडे, कान, नाक, घसा तज्ज्ञ**

# शरीरामधील उष्णतेत होते वाढ

## जडतात मूळव्याध, ॲसिडिटीसारखे आजार



वाढत्या तापमानामुळे शरीराच्या उष्णतेतही वाढ होते. यामुळे पोटात आग होणे, मूळव्याध, ॲसिडिटी यासारखे आजार जडतात. योग्य काळजी आणि आहार घेतल्यास यावर नियंत्रण मिळवणे शक्य असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

उन्हाळ्यात 'सन स्ट्रोक'चा धोका अधिक असतो. वाढत्या तापमानाचा परिणाम आपल्या शरीरावरही होतो. त्यामुळे पाणी कमी होऊन शरीरातील उष्णता वाढते. यासाठी जास्तीत-जास्त द्रव पदार्थांचा आहारात समावेश करावा. गोड, थंड पदार्थांचे सेवन करावे. यासह शरीरातील इलेक्ट्रोराइटचे प्रमाण योग्य ठेवणे महत्त्वाचे ठरते. शरीरातील उष्णता वाढल्यास घरात असतानाही माणसाला धोका संभवतो. यामुळे योग्य काळजी घेणे महत्त्वाचे ठरते.

आहारातून घालवा उन्हाचा थकवा, स्वयंपाकघरातील 'हे' पदार्थ ठरतात उपयुक्त

तापमान वाढ रोखण्यासाठी झाडे लावणे उत्तम पर्याय. तापमानवाढीचा परिणाम शरीराच्या उष्णतेवर होत असल्याने, आहारदेखील महत्त्वाचा ठरतो. पोटात आग होणे, मूळव्याध, ॲसिडिटी यासारखे आजार होतात. यासाठी द्रव आहाराचे सेवन वाढवावे. त्यात वेगवेगळे शरबत, पन्हे, ताक, लस्सी यांचा समावेश करू शकता.

**– डॉ. मनोज जोशी, आयुर्वेदतज्ज्ञ**

### अशी घ्यावी काळजी

- भरपूर पाणी पिऊन घराबाहेर पडावे. बाहेर पडताना पांढऱ्या कपड्याने कान झाकावे.
- लस्सी, ताक, लिंबू पाणी, पन्हे, कोकम शरबत घ्यावे.
- इलेक्ट्रोराइट बॅलन्स साठी लोणचे,चटणी याचे सेवन वाढवावे.
- वाळा, चंदन, नागरमोथा थंड पाण्यात भिजवून ते पाणी प्यावे.
- जिरेपूड टाकून देखील ताकाचे सेवन करू शकतात.

## दिनविशेष

**घटना**

१९७४: रेल्वे कामगारांचा देशव्यापी संप झाला. सरकारविरुद्धचा असंतोष वाढत जाऊन आणीबाणी पुकारली जाण्याला जी कारणे घडली, त्यात हा संप महत्त्वाचा मानला जातो.

१९६२: पश्चिम बंगाल येथील कोलकाता रवींद्र भारती विद्यापिठाची स्थापना.

१९४५: दुसरे महायुद्ध युरोप विजय दिन - जर्मनीची दोस्त राष्ट्रांसमोर बिनशर्त शरणागती, युरोपमधील युद्ध समाप्त.

१९३३: महात्मा गांधी यांनी ब्रिटिश राजवटीविरुद्ध आपले २१ दिवसांचे उपोषण सुरू केले.

१९३२: पं. विष्णू दिगंबर पलुसकरशिष्य पं. विनायकराव पटवर्धन यांनी पुणे गांधर्व महाविद्यालय सुरू केले.

१९१२: पॅरामाउंट पिक्चर्स (Paramount Pictures) या कंपनीची स्थापना झाली.

१८९९: क्रांतिकारक वासुदेव चाफेकर यांना फाशी.

१८८६: जॉन पेंबरटन यांनी कोका कोला हे पेय पहिल्यांदाच तयार करुन विकले.

**जन्म**

१९८९: दिनेश पटेल - भारतीय बेसबॉलपटू

१९७०: मायकेल बेव्हन - ऑस्ट्रेलियन क्रिकेटखेळाडू

१९२५: गुरुराजा श्यामाचार्य अमूर - भारतीय साहित्यिक समीक्षक आणि लेखक - साहित्य अकादमी पुरस्कार (निधनः २८ सप्टेंबर २०२०)

१९१६: रामानंद सेनगुप्ता - भारतीय सिनेमॅटोग्राफर

१९१६: स्वामी चिन्मयानंद सरस्वती - भारतीय अध्यात्मिक गुरू (निधनः ३ ऑगस्ट १९९३)

१९०६: प्राणनाथ थापर - भारताचे माजी भूसेनाप्रमुख

१८८४: हॅरी एस. ट्रूमन - अमेरिकेचे ३३ वे राष्ट्राध्यक्ष (निधनः २६ डिसेंबर १९७२)

१८५६: पेड्रो लास्कुरेन - मेक्सिकोचे ३८ वे अध्यक्ष, ते एवढ्या ४५ मिनिटांसाठी अध्यक्ष बनले (निधनः २१ जुलै १९५२)

१८२८ : हेनरी डूनेंट - रेड क्रॉस संस्थेचे सहसंस्थापक (निधनः ३० ऑक्टोबर १९१०)

**निधन**

२०२२: महेंद्र राज - भारतीय संरचनात्मक अभियंते आणि डिझाइनर

२०२२: सुनील कांती रॉय - भारतीय उद्योजक - पद्मश्री (जन्मः ८ जानेवारी १९४४)

२०२२: रजत कुमार कार - भारतीय नाटककार, लेखक आणि प्रसारक - पद्मश्री (जन्मः २ ऑक्टोबर १९३४)

२०१४: रॉजर एल ईस्टन - जीपीएस प्रणालीचे सहसंशोधक (जन्मः ३० एप्रिल १९२१)

२०१३: झिया फरिदुद्दीन डागर - धृपद गायक (जन्मः १५ जून १९३२)

२००३: डॉ. अमृत माधव घाटगे - संस्कृत व प्राकृत विद्वान (जन्मः १० ऑगस्ट १९१३)

१९९५: प्रेम भाटिया - पत्रकार, संपादक, राजकीय विश्लेषक आणि मुत्सद्दी (जन्मः ११ ऑगस्ट १९११)

१९८४: लीला बेल वॉलेस - रीडर डायजेस्टच्या सहसंस्थापिका (जन्मः २५ डिसेंबर १८८९)

१९८२: कवी अनिल - ४० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष (जन्मः ११ सप्टेंबर १९०१) १९८२: आत्माराम रावजी देशपांडे - साहित्यिक आणि कवी (जन्मः ११ सप्टेंबर १९०१)

# केश किंग अँन्टि-हेअरफॉल शॅम्पूने नव्या ब्रँड कम्युनिकेशनसाठी सादरीकरण




मुंबई - केश किंग अँन्टि-हेअरफॉल शॅम्पूच्या आपल्या नव्या जाहिरातीमध्ये पलक तिवारी, सिनेमा क्षेत्रातील उद्योन्मुख तारा हीची तरूण ऊर्जा आणि शिल्पा शेट्टीचे चिरस्थायी सौंदर्य एकत्र आणले आहे. वर्ष 2019 पासून शिल्पा शेट्टी आमची ब्रँड ॲम्बॅसेडर आहे आणि केश किंग आयुर्वेद ऑइल, भारताच्या नं. 1 हेअर फॉल एक्सपर्टला एंडॉर्स करीत आहे.

राजू हिराणी फिल्म्सद्वारे निर्मित, या नव्या केश किंग अँन्टि-हेअरफॉल शॅम्पूचा कमर्शिअल मध्ये या दोन्ही नट्या अगदी मनोरंजक संवाद करताना दिसतील आणि "उडे जब जब जुल्फे तेरी" सारख्या जुन्या काळातल्या गाण्याने याला आणखी खास बनवले आहे. हे कमर्शिअल मे महिन्यापासून प्रासारित केले जाईल.

या नव्या कमर्शिअलबद्दल सांगताना श्रीमति प्रीती सुरेका, ईमामी लिमिटेड, म्हणाल्या, 'केश किंग हा केस आणि स्कॅल्पची काळजी घेणारा एक ब्रँड आहे आणि हा आयुर्वेदावर आधारीत आहे. या ब्रँडने अनेक वर्ष आपल्या ग्राहकांच्या गरजा पूर्ण केल्या. शिल्पा शेट्टी याची ब्रँड ॲम्बॅसेडर आहे. शिल्पा नेहमीच योगाच्या माध्यमातून एक आरोग्यपूर्ण जीवनशैली आत्मसात करण्याचा सल्ला देत आली आहे आणि म्हणूनच ब्रँडच्या नैसर्गिक उपचार देण्याच्या वचनबद्धतेसाठी ती अगदी योग्य आहे. दररोज गळणाऱ्या केसांनी त्रस्त झालेल्या आजच्या पिढीला बाजारात असलेल्या उत्पादनांच्या तुलनेत केसांसाठी एक उत्तम समाधान देण्यासाठी अतिशय टॅलेंटेड पलक तिवारीलासुद्धा आमच्या सोबत सामिल करण्यात आले आहे. बॉलीवूडची एक उद्योन्मुख कलाकार म्हणून पलक तिवारी आणि शिल्पाचे सदैव असणारे सौंदर्य लोकांमध्ये एक नवा उत्साह जागृत करेल आणि अगदी नव्या पद्धतीने ब्रँडबद्दलची माहिति त्यांच्या पर्यंत पोहचवेल.

पलक तिवारी, केश किंग ब्रँडसोबत आपला प्रवास सुरू करणारी सर्वात्त नवी सदस्या म्हणाली "भारताची महान आयुर्वेदिक परंपरा एक आरोग्यपूर्ण आयुष्य जगण्यासाठी परिपूर्ण उपचार प्रदान करते. आजकालच्या ह्या व्यस्त आणि वेगवान जीवनात केस गळण्यासारख्या दररोजच्या आव्हानाशी लढवण्यासाठी, आम्हाला हवा एक नैसर्गिक उपाय. मला माझे लांब केस खूप आवडतात, ज्यांची नियमित काळजी घेण्याची आणि लक्ष देण्याची गरज आहे. माझ्या केसांना मजबूत आणि निरोगी ठेवण्यासाठी फक्त अस्सल आणि विश्वासार्ह उपचारावर विश्वास ठेवते, जसे केश किंग. मला आनंद होतोय की मी केश किंग अँन्टि-हेअरफॉल शॅम्पूशी जोडले गेले आहे आणि टॅलेंटेड आणि सेलिब्रेटेड शिल्पा शेट्टीसोबत एकाच स्क्रीनवर काम करणे माझ्यासाठी अभिमानास्पद आहे"

ह्या अनुभवाबद्दल बोलताना शिल्पा शेट्टी म्हणाली "केश किंग सोबतच्या माझ्या प्रवासाला 5 वर्ष पूर्ण झाली आहेत. मला अभिमान आहे की मी ह्या शुद्ध आयुर्वेदिक प्रोडक्टचा एक भाग आहे. आपल्या क्वॉलिटी, फायदा आणि प्रभावामुळे, ह्याने लाखो लोकांचा विश्वास जिंकला आहे. मला आनंद आहे की आता पलकसुद्धा केश किंग/इमामी परिवाराचा भाग होत आहे आणि आम्ही एकत्र आयुर्वेदच्या मौल्यावान फायद्यांची ओळख युवा पिढीला करून देऊ. हा ब्रँड टेलिव्हिजन, प्रिंट आणि पॉइंट-ऑफ-सेल कम्युनिकेशन सारख्या पारंपारिक मिडियाच्या माध्यमाने या दोन सेलिब्रिटिंच्या लोकप्रियतेसोबत लोकांची मने जिंकू इच्छितो. आणि याचसोबत शिल्पा आणि पलकच्या उपस्थितीने समाजाच्या प्रत्येक वयाच्या लोकांसोबत थेटपणे संपर्क साधून डिजिटल स्पेसमध्ये विविध कॉन्टेस्ट आणि चॅलेंजद्वारे आपल्या विश्वासाला मजबूत बनवू इच्छितो. 21 वनौषधींच्या गुणांनी समृद्ध केश किंग अँन्टि - हेअरफॉल शॅम्पू 98% पर्यंत हेअरफॉल कमी करते, हे क्लिनीकली सिद्ध झाले आहे. याचसोबत हे स्कॅल्पला पोषण देते आणि केसांना बनवते रेश्मी, चमकदार आणि मऊ. केश किंग अँन्टि-हेअरफॉल शॅम्पू 5.5 एमएल सॅशे, 80 एमएल, 200 एमएल, 340 एमएल, 600 एमएल आणि 1 लिटरच्या पॅक मध्ये उपलब्ध आहे आणि ह्याची किंमत अनुक्रमे रु. 2, रु. 65, रु. 150, रु. 300, रु. 620 आणि रु. 849 आहे.

# जम्मू काश्मीरमध्ये सुरक्षा दलांना मोठे यश!

## चकमकीत लष्करचा प्रमुख बासित अहमद डारसह तीन दहशतवादी ठार

दक्षिण काश्मीरच्या कुलगामच्या रेडवानी पाइन भागात दहशतवाद्यांसोबत सुरु असलेल्या चकमकीदरम्यान सुरक्षा यंत्रणांना मोठं यश मिळाले आहे. सुरक्षादलाने या चकमकीत लष्कर-ए-तैयबाचा टॉप कमांडर बासित अहमद डार याच्यासह तीन दहशतवाद्यांना ठार केले आहे. मारले गेलेल्या दहशतवाद्यांची ओळख अद्याप पटली नाहीये. आज सकाळी लष्कर कमांडर बासित अहमद डार याला कुलगाम येथे घेरले असल्याची माहिती समोर आली होती.

सुरक्षा दलांना लष्करच्या ठिकाणांबद्दल गुप्त माहिती मिळाली होती, त्यानंतर सोमवारी सुरक्षा दलांनी परिसरात तपास अभियान सुरू केले. या दरम्यान दहशतवाद्यांनी अचानक फायरिंग सुरू केली, त्यानंतर सुरक्षा दलांनी



देखील जोरदार प्रत्युत्तर दिले. काश्मीर झोन पोलीसांनी आपल्या एक्स हँडलवर एक पोस्ट करता माहिती दिली होती की कुलगाम जिल्ह्यातील रेडवानी पाइन भागात चकमक सुरू असून पोलीस आणि सुरक्षा दल काम करत आहेत.

जम्मू काश्मीर च्या पुंछ जिल्ह्यात चार मे रोजी दहशतवाद्यांनी भारतीय हवायी दलाच्या ताफ्यावर हल्ला केला होता. सुरक्षा अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार या हल्ल्यात आयएएफचा एक जवा शहिद झाला आहे. तर चार इतर जवान जखमी झाले होते.

अधिकाऱ्यांनी सांगितले की हा हल्ला शनिवारी संध्याकाळी झाला जेव्हा हवाई दलाचा ताफा सुरनकोट परीसरातून सनाई टॉपकडे जात होता. या हल्ल्यासाठी जबाबदार दहतवाद्यांचा शोध घेणअयासाठी मोठ्या प्रमाणात शोध मोहिम सुरू करण्यात आली. जम्मू काश्मीरच्या पुंछ जिल्ह्यात सुरक्षा दलावर झालेला हा वर्षातील दुसरा हल्ला आहे. जानेवारी मध्ये सेनेच्या ताफ्यावर कथित दहशतवाद्यांनी गोळीबार केला होता.

# मनीष सिसोदिया यांना दिलासा नाहीच, न्यायालयीन कोठडीत 15 मे पर्यंत वाढ



दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांना पुन्हा एकदा झटका बसला आहे. दिल्ली दारू घोटाळ्याशी संबंधित सीबीआय प्रकरणात राऊस एव्हेन्यू न्यायालयाने मनीष सिसोदिया यांच्या न्यायालयीन कोठडीत १५ मेपर्यंत वाढ केली आहे.

दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सीबीआय प्रकरणातील आरोपींवर आरोप निश्चित करण्याबाबतची सुनावणी 15 मे पर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. दिल्लीतील राऊस अॅव्हेन्यू न्यायालयात आता पुढील सुनावणी १५ मे रोजी होणार आहे. याशिवाय दिल्ली उत्पादन शुल्क धोरणाशी संबंधित मनी लॉंड्रिंगशी संबंधित ईडी प्रकरणात सिसोदिया आधीच 8 मे पर्यंत न्यायालयीन कोठडीत आहेत.

ईडी आणि सीबीआय या दोन्ही तपास यंत्रणा दिल्ली मद्य धोरण प्रकरणात सिसोदिया यांच्या भूमिकेची चौकशी करत आहेत. सिसोदिया यांना गेल्या वर्षी फेब्रुवारीमध्ये अटक करण्यात आली होती. ईडी आणि सीबीआयने दिल्ली मद्य धोरणाची अंमलबजावणी आणि तयारीमध्ये अनियमितता झाल्याचा दावा केला आहे. दिल्लीच्या केजरीवाल सरकारमधील अनेक मंत्री यात सहभागी झाले आहेत. ईडीने नुकतेच केजरीवाल यांचे या प्रकरणात मुख्य सूत्रधार म्हणून नाव दिले आहे.

# उन्हाने वाढवला नागपूरकरांचा ताप; पारा ४२.६ अंशांवर



नागपूर - रविवारी मोसमातील सर्वात उष्ण दिवस अनुभवणाऱ्या नागपूरकरांना आजही उन्हाचे तीव्र चटके सोसावे लागले. रविवारच्या तुलनेत सोमवारी कमाल तापमानात किंचित घसरण झाली असली तरी, उकाड्याने हैराण केले. विदर्भात सर्वाधिक तापमानाची नोंद ब्रम्हपुरीत झाली. मंगळवारपासून अवकाळी पावसाची शक्यता असल्याने पारा घसरून वैदर्भींना दिलासा मिळू शकतो.

आठ दिवसांपासून उन्हाची तीव्र लाट सुरू आहे. वाढत्या उष्णतेने अवघ्या विदर्भालाच कवेत घेतले आहे. सोमवारी विदर्भातील अकरापैकी तब्बल दहा जिल्ह्यांचे तापमान ४० अंशांच्या वर होते. सूर्यनारायणाचा सर्वाधिक प्रकोप ब्रम्हपुरी येथे झाला. येथील ४४.१ अंश सेल्सिअस तापमान राज्यात सर्वाधिक ठरले. सोलापूर येथेही इतक्याच तापमानाची नोंद झाली.

विदर्भात दहा जिल्हे ४१ अंशांच्यावर

नागपूरच्या तापमानात किंचित घसरण होऊन पारा ४२.६ अंशांवर आला. याशिवाय चंद्रपूर (४३.६ अंश सेल्सिअस), वर्धा ४३.५ अंश सेल्सिअस), वाशीम ४३.४ अंश सेल्सिअस) आणि अमरावती (४३.२ अंश सेल्सिअस) येथेही उन्हाचे चटके बसले. रविवारच्या तुलनेत विदर्भातील तापमानात थोडीफार घसरण झाली. मात्र उकाडा कायम होता. उन्हाच्या तीव्र झळा दिवसाच नव्हे, सूर्यास्तानंतरही कायम होत्या. यामुळे कुलर व पंखे प्रभावीहिन ठरत आहेत.

## बापरे, ओमानमध्ये ५३.४ डिग्री

जागतिक तापमानावर नजर टाकल्यास ओमानमधील जोबा येथे तब्बल ५३.४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली. येथे जगात सर्वाधिक तापमान नोंदले गेले. तर बर्फाळ प्रदेश असलेल्या अंटार्क्टिकामधील कॉंकर्डिया येथे उणे ७४.४ डिग्री तापमानाची नोंद झाली. जागतिक तापमानाची नोंद करणाऱ्या 'एल डोराडो' या संकेतस्थळावरील नोंदीनुसार, जगातील पहिल्या १५ शहरांमध्ये भारतातील तीन शहरांचा समावेश आहे.

# फलटणमध्ये रणजितसिंह नाईकनिंबाळकरांनी बजावला मतदानाचा हक्क!



फलटण - तिसऱ्या टप्प्यासाठी सुरू असलेल्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज माढा लोकसभा मतदारसंघांतर्गत फलटण विधानसभा मतदारसंघात दिग्गजांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये विधान परिषदेचे माजी सभापती तथा विद्यमान आमदार श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी आपले मतदानाचे कर्तव्य पार पाडले. त्याचबरोबर फलटण-कोरेगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार दीपक चव्हाण यांनीही मतदान करून लोकशाहीच्या महाउत्सवात सहभाग नोंदविला. दुसरीकडे माढ्याचे लोकसभा मतदारसंघाचे विद्यमान खासदार व पुन्हा खासदार होण्यासाठी निवडणुकीच्या मैदानात असलेले रणजितसिंह नाईक निंबाळकर व सौ. जिजामाला रणजितसिंह नाईक निंबाळकर या दाम्पत्यानेही सकाळीच आपला मतदानाचा हक्क बजावला.

दरम्यान, सकाळच्या सत्रात माढा लोकसभा मतदारसंघात सुमारे २० टक्क्यांच्या आसपास मतदान झाले असून कडक उन्हामुळे दुपारच्या सत्रात मतदारांचा मतदानासाठी ओघ कमी झाल्याचे दिसून येत होते.

# एकाही पक्षाने मुस्लिम उमेदवार दिला नाही - ओवैसी

## उद्धव ठाकरे आता स्वतःला सेक्युलर समजताहेत

छत्रपती संभाजीनगर- ''महाराष्ट्रात ४८ लोकसभेसाठी निवडणुका सुरू आहेत. यात दोन शिवसेना, दोन राष्ट्रवादी, भाजप आणि अर्धी काँग्रेस, या एकाही पक्षाने मुस्लिम उमेदवार दिला नाही. आता नव्याने स्वतःला सेक्युलर म्हणून घेणाऱ्या उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेनेही एकही उमेदवार दिला नाही. हे उद्धव ठाकरे जेव्हा मुख्यमंत्री व त्यांचा मुलगा मुरब्बी राजकारणी होईल तेव्हा ते मुस्लिमांना विसरून जातील'', असे एमआयएमचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार असदुद्दीन ओवैसी सोमवारी (ता. सहा)




म्हणाले.

अमखास मैदानावर एमआयएमच्या प्रचारार्थ झालेल्या सभेत ते बोलत होते. ते म्हणाले, ''तीस वर्षांपासून इथे एक उमेदवार खान पाहिजे की बाण असा घोषणा करत जातीय वातावरण निर्माण करत जिंकायचा. मात्र, वर्ष २०१९ ला चित्र पालटले आणि जिल्ह्यातील सर्व समाजातील मतदारांनी इम्तियाज जलील यांनी निवडून आणले.

आता चंद्रकांत खैर हे ईदगा, मशीद आणि नमाजापर्यंत पोचले आहेत आणि निवडून आल्यानंतर पुढील पाच वर्षांत काय होईल याचा विचार करा. जेव्हा संसदेमध्ये यूपीए, ट्रिपल तलाक, एनआरसीचा कायदा तयार होत होता त्यावेळेस शिवसेना आणि राष्ट्रवादी यांनी पाठिंबा दिला आणि हे आता मुस्लिमांच्या हिताची गोष्ट करीत आहे. हा केवळ निवडणुकीचा जुमला आहे.

# धाराशिवमध्ये मतदान केंद्राबाहेर राजकीय कार्यकर्त्याची हत्या

धाराशिव : धाराशिवमध्ये मतदान केंद्राबाहेर एका राजकीय कार्यकर्त्याची हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. राजकीय वादातून ही घटना घडल्याचं सोशल मीडियावर बोललं जात आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, भूम तालुक्यातील पाठसांगवी इथं दोन गटात झालेली मारहाणीची घटना ही वैयक्तिक कारणावरुन झाल्याची पोलिसांनी माहिती दिली आहे. मतदान केंद्राच्याबाहेर गौरव उर्फ लाल्या अप्पा नाईकनवरे (वय २३) आणि समाधान नानासाहेब पाटील (वय २७) यांच्यात वैयक्तिक कारणावरुन वाद झाला.

# Rohit Sharma's dipping form : Ahead of T20 World Cup




The T20 World Cup 2024 is about to start next month and Team India's skipper Rohit Sharma has suddenly witnessed a dip in form. The dip is seen after starting the campaign in sublime fashion for 5-time champions Mumbai Indians.

Former Indian cricketer and commentator Aakash Chopra has highlighted the concerning decline in the form of Mumbai Indians' opener, Rohit Sharma, a concern shared by fans and cricket followers, with implications not only for the IPL franchise but also for the upcoming T20 World Cup for the Indian team.

During the match against Sunrisers Hyderabad, while chasing a modest target of 174 runs, Rohit Sharma's difficulties at the crease persisted as he was dismissed for just four runs off five deliveries.

This disappointing performance adds to a series of low scores for the former Mumbai Indians' captain since his impressive century against Chennai Super Kings on April 14th.

Sharma's subsequent scores of 6 against Rajasthan Royals, 8 against Delhi Capitals, 4 against Lucknow Super Giants, 11 against Kolkata Knight Riders, and now 4 against SRH, demonstrate a troubling pattern of consistently failing to reach double-digit scores.

His dismissal against SRH, where he attempted a big shot off Pat Cummins only to be caught behind by Heinrich Klaasen, encapsulated his struggles in finding his form and timing at the crease.

# CM Arvind Kejriwal's Custody extended by Delhi Court

## ED's Liquor Policy Case : Judicial Custody extended Till May 20

The judicial custody of Chief Minister Arvind Kejriwal was extended till May 20 by A Delhi Court on Tuesday. This extension came in the money laundering case connected to the liquor policy scam.

The order was passed by Special judge Kaveri Baweja of Rouse Avenue Courts on the expiry of his judicial custody in the ED case. Meanwhile, hearing in Supreme Court on the issue of granting interim bail to Kejriwal is currently



underway. Kejriwal was arrested by the Enforcement Directorate (ED) on the night of March 21.

On April 10, the Delhi High Court dismissed Kejriwal's plea challenging his arrest, observing that ED was able to place enough material, statements of approvers and AAP's own candidate stating that Kejriwal was given money for Goa elections. The Delhi Chief Minister has challenged the said order of the Delhi High Court bench of Justice Swarana Kanta Sharma before the Top Court.

It is ED's case that the excise policy was implemented as part of a conspiracy to give wholesale business profit of 12 percent to certain private companies, although such a stipulation was not mentioned in the minutes of meetings of Group of Ministers (GoM). The Central agency has also claimed that there was a conspiracy that was coordinated by Vijay Nair and other individuals along with South Group to give extraordinary profit margins to wholesalers.


According to the agency, Nair was acting on behalf of Chief Minister Arvind Kejriwal and Manish Sisodia.

# Supreme Court directs Maharashtra Govt.

## Structural & Safety Audit Of 150-Yr-Old Bombay High Court Heritage Building to be done before Monsoon

The Supreme Court on Tuesday has directed the Maharashtra Public Works Department to conduct a structural and safety audit of the present Bombay High Court building in Fort, Mumbai before monsoon, since the heritage building is nearly 150 years old and construction of a new building for the High Court will take a few years.

The court also directed a meeting to be conducted among Chief Justice of the HC, Chief Secretary of Maharashtra, and representatives of the Union government to decide upon a common building to provide temporary alternative accommodation for the HC. It asked the



Solicitor General of India Tushar Mehta to also attend the meeting online.

A special bench of Chief Justice DY Chandrachud, Justice BR Gavai and Justice JB Pardiwala, was hearing a suo moto petition regarding the heritage building of the Bombay High Court and the issue of additional land allotment.

The court said that the Maharashtra government should be proactive and hand over land allotted in Bandra East for the new building to the Bombay High Court immediately, so that construction of the new HC complex can begin.

The court noted that staff colonies existed on the allocated lands and urged the State to act promptly and ensure the relocation of the occupants. It emphasized the pressing need for additional space for the High Court and chambers.

The matter is scheduled for further proceedings on May 17, 2024, where the authorities must apprise the court of the progress made in addressing the infrastructure needs of the Bombay High Court.

# पाणी बचतीसाठी १० जूनपर्यंत ठाणे महापालिकेने पाणी वापरावर घातले निर्बंध

**ठाणे प्रतिनिधी**

तीव्र उन्हाच्या झळांमुळे धरणातील पाणी साठा कमी होत चालला असून या पार्श्वभूमीवर ठाणे महापालिकेचे आयुक्त सौरभ राव यांनी शहरामध्ये वाहने धुण्यास मनाई आदेश दिले आहेत. ठाणे महापालिका क्षेत्रात, १० जून२०२४ पर्यंत दूचाकी, तीन चाकी, चारचाकी वाहने, मोठी वाहने धुणे, तसेच पाण्याने साफसफाई करणे या कामांवर पालिकेने निर्बंध घालण्यात आले आहे. या निर्बंधांचे उल्लंघन करणाऱ्या सर्व्हिस सेंटरवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलमांनुसार दंडात्मक कारवाई केली जाईल, असेही महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

सध्या तीव्र उन्हाळा सुरू असल्याने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, गावे यांना पाणी पुरवठा करणाऱ्या धरणातील पाणी साठा दिवसेंदिवस कमी होत आहे. त्याचबरोबर, ठाणे महापालिका क्षेत्रातील विहिरी आणि कूप नलिका यांच्यातील पाण्याची पातळीही वेगाने कमी होत आहे. त्यामुळे भविष्यात तीव्र पाणी टंचाईची समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर पाणी बचतीची आवश्यकता आहे. म्हणून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून ठाणे महापालिका क्षेत्रातील सर्व सर्व्हिस सेंटरमधील वाहने धुणे, पाण्याने साफसफाई करणे यास मनाई करण्यात आली आहे. त्याचबरोबर, नागरिकांनीही पाण्याचा वापर काटकसरीने करून



पाणी बचत करावी, असे आवाहन महापालिकेने केले. शक्यतो दररोज गाड्या धुतल्या जावू नयेत. त्याऐवजी बोअरवेलच्या पाण्याने ओल्या केलेल्या कपड्याने गाड्या पुसाव्यात, अशी सूचना महापालिकेने नागरिकांना केली आहे. ठाणे महापालिकेकडून घेण्यात आलेल्या या निर्णयामुळे अश्चर्य व्यक्त केले जात असून हा निर्णय वादग्रस्त ठरण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

अंगणात पाणी मारू नये. नळ सुरू ठेऊन कामे करणे टाळावी. घरातील नळांची गळती दुरुस्त करा. सोसायटीतील गळकी टाकी, पाईप, व्हॉल्व्ह दुरुस्त करावेत. इमारतींच्या छतावरील टाकी ओव्हरफ्लो होवू नये याची दक्षता घ्यावी. त्यासंदर्भात, तक्रारी प्राप्त झाल्यास किंवा अशी गळती. आढळल्यास संबंधीत इमारतीचे-सोसायटीचे नळ कनेक्शन खंडीत करण्यात येईल.

■ आह्या अनुभवाबद्दल बोलताना शिल्पा शेट्टी म्हणाली "केश किंग सोबतच्या माझ्या प्रवासाला 5 वर्ष पूर्ण झाली आहेत. मला अभिमान आहे की मी ह्या शुद्ध आयुर्वेदिक प्रोडक्टचा एक भाग आहे. आपल्या क्वॉलिटी, फायदा आणि प्रभावामुळे, ह्याने लाखो लोकांचा विश्वास जिंकला आहे. मला आनंद आहे की आता पलकसुद्धा केश किंग/इमामी परिवाराचा भाग होत आहे आणि आम्ही एकत्र आयुर्वेदच्या मौल्यावान फायद्यांची ओळख युवा पिढीला करुन देऊ. हा ब्रँड टेलिव्हिजन, प्रिंट आणि पॉइंट-ऑफ-सेल कम्युनिकेशन सारख्या पारंपारिक मिडियाच्या माध्यमाने या दोन सेलिब्रिटिंच्या लोकप्रियतेसोबत लोकांची मने जिंकू इच्छितो. आणि याचसोबत शिल्पा आणि पलकच्या उपस्थितीने समाजाच्या प्रत्येक वयाच्या लोकांसोबत थेटपणे संपर्क साधून डिजिटल स्पेसमध्ये विविध कॉन्टेस्ट आणि चॅलेंजद्वारे आपल्या विश्वासाला मजबूत बनवू इच्छितो. 21 वनौषधींच्या गुणांनी समृद्ध केश किंग ॲन्टि - हेअरफॉल शॅम्पू 98% पर्यंत हेअरफॉल कमी करते, हे क्लिनीकली सिद्ध झाले आहे. याचसोबत हे स्कॅल्पला पोषण देते आणि केसांना बनवते रेश्मी, चमकदार आणि मऊ. केश किंग ॲन्टि-हेअरफॉल शॅम्पू 5.5 एमएल सॅशे, 80 एमएल, 200 एमएल, 340 एमएल, 600 एमएल आणि 1 लिटरच्या पॅक मध्ये उपलब्ध आहे आणि ह्याची किंमत अनुक्रमे रु. 2, रु. 65, रु. 150, रु. 300, रु. 620 आणि रु. 849 आहे.

# मीरा भायंदर महापालिकेचे मुख्य अभियंता दीपक खांबित यांनी कायद्याचं उल्लंघन केल्याप्रकरणी निवडणूक आयोगाने पाठवली नोटीस

**ठाणे प्रतिनिधी**




मीरा भायंदर महापालिकेचे मुख्य अभियंता दीपक खांबित यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. दीपक खांबित यांना निवडणूक आयोगाने कायद्याचं उल्लंघन केल्याप्रकरणी नोटीस पाठवली आहे. निवडणूक आयोगाच्या नियमांचं पालन का केलं नाही? तुमच्यावर कारवाई का करू नये? असा सवालच निवडणूक आयोगाने खांबित यांना विचारलं आहे. तसेच त्यांना याप्रकरणी उत्तर देण्याचे आदेशही निवडणूक आयोगाने दिले आहेत. त्यामुळे खांबित निवडणूक आयोगाला काय उत्तर देतात याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. कोणत्याही परवानगीशिवाय ॲप्टिट्यूड टेस्ट होणार नाही, असे निवडणूक आयोगाने आदेश दिले होते. त्यानंतरही अभियंता दीपक खांबित यांनी कोणतीही परवानगी न घेता निवडणुकीचं काम सोडून कर्मचाऱ्यांच्या परीक्षेच्या कामावर भर दिला. तीन दिवस ते परीक्षेच्या कामाची तयारी करत होते. या काळात त्यांनी सिव्हिक ॲपही बंद ठेवले. तीन दिवस ॲप बंद राहिल्याने निवडणूक कामावर त्याचा प्रचंड प्रभाव पडला. त्यामुळेच त्यांना आयोगाने नोटीस बजावली आहे. दीपक खांबित यांनी निवडणूक कामाकडे दुर्लक्ष करून 26 एप्रिल रोजी एमबीएमसीतील कार्यरत 46 ज्युनिअर अभियंत्याची ॲप्टिट्यूड टेस्ट घेण्याचा निर्णय घेतला.

# पेण तालुक्यातील बाळगंगा प्रकल्पग्रस्तांचा मतदानावर बहिष्कार, दहाही मतदान केंद्रांवर शुकशुकाट




**रायगड प्रतिनिधी**

पेण तालुक्यात बाळगंगा प्रकल्पग्रस्तांनी जाहीर केल्याप्रमाणे रायगड लोकसभा निवडणुकीच्या मतदानावर बहिष्कार घातला आहे. त्यामुळे १० मतदार केंद्रांवर सकाळी साडेअकरापर्यंत शुकशुकाट होता. जिल्हा प्रशासन आणि लोकप्रतिनिधी आपल्याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत त्यांनी मतदान न करण्याचा निर्णय घेतला आहे.बाळगंगा धरण प्रकल्पग्रस्तांचे १३ वर्षांपासून पुनर्वसन केलेले नाही, त्यांच्या कोणत्याच मागण्यांची पूर्तता केली नाही. त्यामुळे त्यांनी लोकसभेसह विधानसभा आणि इतरही निवडणुकांवर बहिष्कार घालण्याचा निर्णय एप्रिलमध्ये घेतला होता. तसे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयाला दिले होते. त्यानंतरही ना त्यांच्या मागण्याची दखल घेतली गेली ना कुणी लोकप्रतिनिधींनी त्यांची भेट घेतली. त्यामुळे शुक्रवारी पुन्हा बाळगंगा धरण प्रकल्पग्रस्तांनी बैठक घेऊन मतदानावार बहिष्कार कायम असल्याची ठाम भूमिका घेतली.त्यानंतर मंगळवारी मतदानाला सुरुवात झाली तेव्हा पेण विधानसभा मतदारसंघातील बाळगंगा धरण प्रकल्पग्रस्तांचा मतदानावर बहिष्कार कायम असल्याचे दिसले.

■ जावळी, निफाड, वरसई क्र.१, वरसई क्र.२, वरसई क्र.३, करोटी, निधवळी, वाशिवली, जांभूळवाडी, घोटे अशा दहा मतदान केंद्रांवर शुकशुकाट पाहायला मिळाला.दरम्यान, बाळगंगा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची मनधरणी करण्यासाठी रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी प्रवीण पवार, उपविभागीय पोलीस अधिकारी शिवाजी फडतरे, पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ,अधिकारी आले होते. पण बाळगंगा प्रकल्पग्रस्त शेतकरी बहिष्कारावर ठाम राहिले. सहा ग्रामपंचायतीतील अंदाजे साडेतीन हजार कुटुंब म्हणजे नऊ ते दहा हजार मतदारांनी मतदान केलेले नाही.

# चेंबरतर्फे नाशिकरोडला नवउद्योजकता कार्यशाळेचे आयोजन

**नाशिक प्रतिनिधी**

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स व नाशिकरोड येथील श्री जैन स्थानकवासी श्रावक संघ यांच्यातर्फे नवउद्योजकता (स्टार्टअप) कार्यशाळा झाली. यात तज्ज्ञ श्रीकांत पाटील यांनी नवउद्योजकता ही संकल्पना समजावून सांगत मार्गदर्शन केले.

नाशिकरोडच्या जैन भवन येथे ही कार्यशाळा झाली. महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, शाखा चेअरमन संजय सोनवणे, कार्यकारिणी सदस्य हेमंत कांकरिया, विकास पगारे, श्री जैन स्थानकवासी श्रावक संघाचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र मंडलेचा, सचिव योगेशकुमार भंडारी, रणजितसिंग आनंद आदी व्यासपीठावर उपस्थित होते.यावेळी पाटील यांनी नवउद्योजकता (स्टार्टअप) संकल्पना, या संकल्पनेचे महत्त्व, त्याची व्यापक बाजारपेठ, यातील संधीचे प्रमाण, शासनाच्या योजना, स्टार्टअपची कार्यपद्धती आदी अनेक मुद्द्यांवर मार्गदर्शन केले. कांतीलाल चोपडा यांनी उद्योजकता वाढीस लागावी यासाठी चेंबरतर्फे सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली.



शाखा चेअरमन संजय सोनवणे यांनी श्रीकांत पाटील यांचा परिचय करून दिला. हेमंत कांकरिया यांनी स्वागत केले. सहसचिव अविनाश पाठक यांनी सूत्रसंचालन केले. विकास पगारे यांनी आभार मानले. महाराष्ट्र चेंबरचे सल्लागार दिलीप साळवेकर, मनीष कांकरिया, दीपक कुमठ, राखी कांकरिया, स्मिता मुंडे, भावना रिपोटे, विनोद बाफना, पुनीत कांकरिया, मते, भरत भोई, प्रीतम संघवी, विजय सबनीस आदींसह व्यापारी, उद्योजक, तरुण उपस्थित होते.

# विदर्भात पुन्हा अवकाळी पावसाचं थैमान! झाडं उन्मळून पडली, शेतमालाचेही प्रचंड नुकसान

**नागपूर प्रतिनिधी**



हवामान विभागाने वर्तविलेल्या अंदाजानुसार विदर्भात पुन्हा अवकाळी पावसाने दमदार हजेरी लावली आहे. विदर्भातील बहुतांश ठिकाणी आज दुपारच्या सुमारास झालेल्या अवकाळी पावसाने अक्षरक्षः धुमाकूळ घालत अनेकांचे मोठे नुकसान केले आहे. तर या अवकाळीचा सर्वाधिक फटका हा शेतकऱ्यांना बसला आहे. आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांचा हाता-तोंडाशी आलेला घास अवकाळी पावसाने हिरावून घेतलाय. अशातच मंगळवारी विदर्भातील नागपूर, वर्धा, यवतमाळ, अमरावती, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया आणि गडचिरोली जिल्ह्यांत अवकाळी पाऊस, विजांच्या कडकडाटास 30-40 प्रतितास सोसाट्याचा वाऱ्याने झोपडपून काढले आहे. तसेच अनेक ठिकाणी मोठी झाडे उन्मळून पडली आहेत, तर काही ठिकाणी नागरिकांचा घरावरील पत्रे उडून गेल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत. तसेच पुढील तीन दिवस हीच परिस्थिथी कायम राहणार असल्याचा अंदाजही नागपूर प्रादेशिक हवामान विभागाने दिला आहे. संभाव्य पावसाचा इशारा लक्षात घेता योग्य ती खबरदारी घ्यावी, अशा सुचनाही देण्यात आल्या आहेत.

# तळोजा प्रदूषणाने बेजार, नागरिकांच्या तक्रारीनंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने संबंधित यंत्रणांना विचारला जाब

**पनवेल प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराला रंगत आली आहे, पनवेलच्या विकासाची स्वप्ने दाखवून मतदारांना विविध आमिषे दाखविली जात आहेत. परंतु वर्षांनुवर्षे तळोजा परिसरातील नागरिकांना त्रासदायक ठरणारा प्रश्न सुटू शकलेला नाही. चार दिवसांपूर्वी पहाटे रसायनांच्या उग्र दर्पाने तळोजातील रहिवाशांना असह्य त्रास झाला. अखेर नागरिकांनी केलेल्या तक्रारीनंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने संबंधित यंत्रणांकडून खुलासा मागितला आहे.

पनवेलमधील तळोजा फेज २ परिसरात पहाटेच्या वेळी रसायनांचा उग्र दर्प येण्याचे प्रकार वारंवार घडत असतात. शुक्रवारी पहाटे पाच वाजण्याच्या



सुमारास रसायनांसारखा दर्प येऊ लागल्यामुळे गाढ झोपेत असलेल्या नागरिकांची झोपमोड झाली. ही दुर्गंधी इतकी असह्य होती की, उकाड्यामुळे उघडलेल्या खिडक्या बंद करण्याची वेळ नागरिकांवर आली. तळोजा फेज २ परिसरात नव्या लोकवस्ती वाढत आहेत.

या रहिवाशांना प्रदूषणाचा त्रास होण्याची ही पहिली वेळ नाही. शेजारी असलेल्या तळोजा एमआयडीसीतील रासायनिक कारखान्यांमधून येणाऱ्या दर्पाचा येथील रहिवाशांना नेहमीच त्रास होत असतो. तळोजातील रहिवासी राजीव सिन्हा यांनी तातडीने संबंधित यंत्रणांना ईमेल करून या प्रकाराची तक्रार केली. शनिवारी पहाटे पुन्हा काही प्रमाणात दुर्गंधी आल्याचे सिन्हा यांचे म्हणणे आहे. सिन्हा यांनी केलेल्या तक्रारीनंतर सीईटीपीतील पाण्याचे नमुने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने चाचणीसाठी घेतल्याचे सांगण्यात आले. लोकसभा निवडणुकीचा प्रचार पनवेल आणि परिसरात जोरदार सुरू आहे. विकासकामांच्या गप्पा राजकीय पदाधिकारी करीत आहेत. परंतु या निवडणुकीत तळोजातील प्रदूषणाच्या मुद्द्याकडे कोणाचेच लक्ष गेलेले नाही. नागरिकांचे मूलभूत प्रश्न निवडणुकीच्या प्रचारातून गायब आहेत, अशी टीका या भागातील नागरिक करीत आहेत.

# उदयनराजेंनी ७ मे ७ वाजून ७ मिनिटं.. लकी मुहुर्तावर केलं मतदान

**सातारा प्रतिनिधी**



लोकशाहीचा मतोत्सव साजरा होत असताना मंगळवारी योगायोगाने निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातील सातारा लोकसभा मतदारसंघाचे मतदान होत आहे आणि ही तारीख आहे ७ मे! हा दुग्धशर्करा योग साधून सातारा लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार उदयनराजे भोसले यांनी सात तारखेलाच मतदान आल्याने सात तारखेला सात वाजून सात मिनिटांनी आपले बहुमूल्य मतदान केले. विशेष म्हणजे उदयनराजेंनी हा योग आवर्जून साधत मतदान केले.

बहुचर्चेत असलेल्या सातारा लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खासदार उदयनराजे भोसले यांनी आपल्या कुटुंबासमवेत मतदानाचा हक्क बजावला. यावेळी त्यांच्या समवेत राजमाता कल्पनाराजे भोसले, पत्नी दमयंतीराजे भोसले उपस्थित होत्या. खा. उदयनराजे भोसले यांचा सात नंबर हा लकी आणि व्हीआयपी नंबर आहे. त्यांच्या आलिशान वाहनांचे नंबर ००७ असेच आहेत. या नंबरचे उदयनराजे भोसले यांच्या कार्यकर्त्यांनी आपली वाहने, अंगावर गोंदणसुद्धा करून घेतले आहे. ००७ म्हटलं की उदयनराजे हे समीकरण आता अबालवृद्धांना परिचित झाला आहे. ००७ जरी शब्द उच्चारला तरी उदयनराजे भोसले यांचा कार्यकर्ता अशी ओळख निर्माण झाली आहे. उदयनराजे यांनी मतदानाचा हक्क बजावल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी सर्व मतदारांना हात जोडले आणि वज्रमूठ दाखवली. सर्व नागरिकांनी मतदानाचा हक्क बाजवावा, असे आवाहनही केले.

# रुपाली चाकणकर यांनी ईव्हीएम मशीनची केली पूजा

## सिंहगड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल



पुणे प्रतिनिधी : बारामती लोकसभा मतदारसंघ देशाच्या नकाशावर आला आहे. या मतदारसंघात मंगळवारी सकाळपासून मोठं-मोठ्या घडामोडी घडल्या. अजित पवार यांचा 'मेरे पास माँ है' हा डायलॉग गाजला. तर सुप्रिया सुळे थेट अजित पवारांच्या घरी गेल्या. राजकीय वातावरण अशा प्रकारे ढवळून निघत असतानाच आता अजून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. त्यामुळे राज्यासह देशात खळबळ उडाली आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी ईव्हीएम मशीनची पूजा केल्याने नवीन वाद ओढावून घेतला आहे.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर या खडकवासाला परिसरातील एका मतदान केंद्रावर पोहचल्या. मतदान सुरु होण्यापूर्वी त्या औक्षण करण्याचे ताट घेऊन मतदान केंद्रात दाखल झाल्या. त्यांनी ताटात दिवा पण ठेवलेला होता. त्यानंतर त्यांनी मतदान केंद्रातील ईव्हीएम मशीनची पूजा केली. मतदानासाठी चाकणकर या ताट आणि दिवा कशाला घेऊन आल्या असतील असा प्रश्न उपस्थित सर्वांनाच पडला होता. मतदान केंद्रावरील अधिकारी पण चक्रावले होते. पण चाकणकरांनी ईव्हीएमची पूजा करताच अधिकारी अचानक झालेल्या या प्रकाराने भांबावले. अशाप्रकारे मतदान केंद्रात जाऊन पूजा करणे हे निवडणूक आयोगाच्या नियमात बसत नसल्याने अधिकाऱ्यानेच याप्रकरणी तक्रार दिली. EVM मशीनची पूजा केल्याप्रकरणी महिला महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांच्या विरोधात पुण्यातील सिंहगड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला.

■ या सर्व प्रकाराची सोशल मीडियावर एकच चर्चा रंगली आहे. ईव्हीएम मशीनची पूजा करतानाचा रुपाली चाकणकर यांचा फोटो राज्यभर एकदम व्हायरल झाला. त्यावरुन समाज माध्यमावर उलटसुलट चर्चा सुरु आहेत. तिसऱ्या टप्प्यात अजित दादांचा डायलॉग, सुप्रिया सुळे यांचे अजित दादांच्या घरी जाणे आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या नेत्या रुपाली चाकणकर यांची ईव्हीएम पूजा यांनी सोशल मीडियावर धुमाकूळ घातला आहे.

# मुंबई महापालिकेच्या आरोग्य यंत्रणांच्या प्रयत्नानंतर घटले मातामृत्यू



मुंबई : गर्भवती महिला व नवजात बाळांच्या आरोग्यासाठी महापालिकेच्या आरोग्य यंत्रणेकडून राबवण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांना आता यश येत आहे. मागील पाच वर्षांमध्ये मुंबईमध्ये मातामृत्यूंचे प्रमाण २२ टक्क्यांनी घटल्याचे उपलब्ध माहितीवरून दिसून येत आहे.सन २०१९मध्ये जन्माला येणाऱ्या एक लाख बालकांमागे ८७ मातामृत्यूंची नोंद झाली होती. करोनाकाळामध्ये ही संख्या वाढून २०२०मध्ये ९१वर गेली. २०२१मध्ये त्यात अल्प घट होऊन ती ८२ झाली. २०२२ मध्ये हा आकडा घटून ७०वर गेला. २०२३पर्यंत हे प्रमाण अजून घटले असून एक लाख नवजात बालकांमागे ६८ मातामृत्यूंची नोंद झाली. लोकसंख्येमध्ये माता व बालकांच्या मृत्यूचे प्रमाण कमी असणे हे आरोग्याचे महत्त्वाचे निर्देशक मानले जाते. दर वर्षी जन्माला येणाऱ्या एक लाख बालकांमध्ये किती मातांचे मृत्यू होतात, याचा अभ्यास केला जातो. त्यावरून त्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या आरोग्य सुविधा, आई व बाळांच्या आरोग्यासंदर्भात घेण्यात येणारी वैद्यकीय काळजी या बाबींचे महत्त्व अधोरेखित होते.मुंबईत माता-बाल आरोग्यात सुधारणा करण्यासाठी प्रसूतिपूर्व काळजी, लवकर नोंदणी, गर्भवतींची चाचणी, नियमित वैद्यकीय पाठपुरावा, प्राथमिक आरोग्य सेवा सक्षम करण्यासाठी अधिकाधिक प्रयत्न अशा उपाययोजना करण्यात आल्या. २०२२मध्ये दोन नवीन प्रसूतिगृहे सुरू करण्यात आली. भांडुप येथील प्रसूतिगृहामध्ये २० खाटांचे एनआयसीयू सुरू करण्यात आले असून यावर्षी त्याचा विस्तार करण्यात येणार आहे. प्रसूतिगृहांना जवळच्या उपनगरीय रुग्णालयांच्या संदर्भसेवा देण्यात आल्या आहे. वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये अतिजोखमीच्या रुग्णांना नेण्यात येत आहे, तर दर दोन महिन्यांनी वैद्यकीय कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य तसेच प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. आशा, आरोग्य कर्मचारी यांच्या मदतीने प्रबोधन करण्यात येत आहे. तसेच विशेषज्ज्ञांची समिती नेमून त्या माध्यमातून प्रसूतीदरम्यान होणाऱ्या मृत्यूंच्या कारणांचे विश्लेषण करण्यात येते.

# घोसाळकर यांच्या हत्येसंदर्भातील सीसीटीव्ही फुटेज कुटुंबियांना दाखवा; हायकोर्टाचे पोलिसांना आदेश

**मुंबई प्रतिनिधी**



घोसाळकरांच्या कुटूंबीयांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल करत आरोप केला की, आरोपपत्र दाखल करण्याची मुदत ९० दिवसांची असताना ६० दिवसांतच मुंबई पोलिसांकडून आरोपपत्र दाखल करण्यात आले. तसेच तक्रारदार आणि मृत अभिषेक घोसाळकर यांच्या पत्नी तेजस्वी घोसाळकर यांचं म्हणणंही नीट ऐकून घेतलं नाही. दुसरीकडे तक्रारदार दररोज काहीतरी नवीन कागदपत्रे सादर करत असल्याची तक्रार पोलिसांनी न्यायालयात केली.त्यामुळे या प्रकरणाला आता नवे वळण लागले असून पोलीस विरुद्ध तक्रारदार असा वाद निर्माण झाला आहे.अभिषेकच्या पत्नी तेजस्वी घोसाळकर यांनी हत्या प्रकरणाच्या तपासावर व पोलिसांच्या कार्यपद्धतीवर सवाल उपस्थित करत हायकोर्टात याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर सोमवारी सुनावणी झाली व पुढील सुनावणी जून महिन्यापर्यंत तहकूब करण्यात आली आहे. मुंबईतील दहिसरमध्ये राहणारा सामाजिक कार्यकर्ता मॉरिस नोरोन्हा याने फेसबुक लाईव्ह करत अभिषेक घोसाळकर यांची हत्या केली. त्यानंतर त्याने स्वतःवरही गोळी झाडून आत्महत्या केली. या घटनेमुळे मुंबईत खळबळ उडाली होती. तसेच राजकीय वातावरणही तापलं होतं. या हत्येच्या चार महिन्यानंतरही या प्रकरणाची सुनावणी पूर्ण झालेली नाही. सोमवारी या प्रकरणी सुनावणी दरम्यान मुंबई उच्च न्यायालयाकडून पोलिसांनी महत्त्वाचे आदेश देण्यात आले आहेत. अभिषेक घोसाळकर यांच्या हत्येसंदर्भातील सीसीटीव्ही फुटेज कुटुंबियांना दाखवा, असे आदेश हायकोर्टाकडून पोलिसांना देण्यात आले आहेत.